❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २४१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# फडणवीसांचं केंद्रात वजन वाढणार

## मंत्री म्हणून नव्हे तर त्यापेक्षाही मोठी जबाबदारी खांद्यावर येणार?

■ मुंबई (दै. संध्या)

दिल्लीच्या जंतरमंतर येथील विद्यार्थी आंदोलनामुळे गेल्या 12 वर्षात पहिल्यांदाच सत्तेला हादरा बसल्यानंतर आता भाजपने राष्ट्रीय पातळीवर गंभीरपणे विचारमंथन आणि आवश्यक उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून लवकरच भाजप पक्षसंघटनेची सर्वोच्च समिती असणाऱ्या संसदीय मंडळात काही बदल केले जाऊ शकतात. यावेळी महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश भाजपच्या संसदी मंडळात होऊ शकतो. यापूर्वी नितीन गडकरी हे भाजपच्या संसदीय मंडळात होते. मात्र, ते संसदीय मंडळातून बाहेर झाल्यानंतर महाराष्ट्राचा एकही नेता याठिकाणी नव्हता. त्यामुळे आता भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांना संसदीय मंडळात संधी दिली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी अलीकडेच भाजपची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर केली होती. त्यानंतर आता भाजपच्या संसदीय मंडळात बदल अपेक्षित आहेत. नितीन नवीन यांच्याकडून लवकरच यासंदर्भात घोषणा केली जाऊ शकते. त्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांचे नाव आघाडीवर असल्याचे मानले जाते. तीन निवडणुकांत भाजपला 100 प्लस जागा निवडून



देणारे देवेंद्र फडणवीस हे एकमेव मुख्यमंत्री आहेत. या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे केंद्रातील देवेंद्र फडणवीस यांचे वजन वाढले आहे. त्यामुळेच देवेंद्र फडणवीस यांना भाजपच्या संसदीय मंडळात स्थान मिळू शकते, अशी चर्चा आहे. फडणवीसांच्या या नियुक्तीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचाही पाठिंबा असल्याचे समजते. गेल्या अनेक दिवसांपासून देवेंद्र फडणवीस दिल्लीला केंद्र सरकारमध्ये जाण्याची जोरदार चर्चा सुरु आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देवेंद्र फडणवीस हे नवे शिक्षणमंत्री होतील, असेही सांगितले जात होते. मात्र, देवेंद्र फडणवीस हे वारंवार आपण महाराष्ट्रातच राहणार असल्याचे सांगत आहेत. तरीही फडणवीसांच्या दिल्लीला जाण्याच्या चर्चा थांबलेल्या नाहीत. अलीकडच्या काळात देवेंद्र फडणवीसांच्या दिल्लीच्या वाऱ्याही वाढल्या आहेत. संसदीय मंडळ ही भाजपची सर्वोच्च आणि सर्वशक्तिशाली समिती आहे. भाजपच्या निर्णयप्रक्रियेत संसदीय मंडळाचा प्रमुख वाटा आहे.

भाजपच्या या संसदीय मंडळात पंतप्रधान मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह यांच्यासह एकूण 12 जणांचा समावेश आहे. गेल्या काही काळात एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला संसदीय मंडळात नियुक्त करण्याचा प्रघात भाजपमध्ये पडला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून यावेळी देवेंद्र फडणवीस यांना संधी मिळू शकते, अशी चर्चा आहे. देवेंद्र फडणवीस हे संसदीय मंडळात गेल्यास त्यांचे स्वत:चे आणि महाराष्ट्राचे केंद्रातील वजन वाढेल. देवेंद्र फडणवीस हे भविष्यात केंद्राच्या राजकारणात जातील, अशी चर्चा महाराष्ट्रात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये कायम असते. त्याचीच ही पहिली पायरी असावी का, याबद्दल सध्या राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत.

# तुकाराम मुंढेंचा मोर्चा मुंबई क्रिकेटकडे

## MCA च्या फूड आऊटलेट्सवर धडक कारवाई, परवाने धडाधड रद्द!

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात सध्या अन्नपदार्थांच्या दुकानांपासून रेस्टॉरंट्सपर्यंत स्वच्छता आणि अन्नसुरक्षेच्या नियमांकडे प्रशासनाचे विशेष लक्ष आहे. महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या कारवाईमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. आता मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधील परिसरातही एफडीएने मोठी कारवाई केली आहे. एफडीएने एमसीएच्या परिसरात सुरू असलेल्या पाच खाद्यपदार्थांच्या आउटलेट्सचे फूड लायसन्स आणि रजिस्ट्रेशन निलंबित केले आहे. या पाचही आउटलेट्समध्ये अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेशी संबंधित अनेक त्रुटी आढळून आल्या. त्याचबरोबर ज्या संस्थेच्या नावावर खाद्य व्यवसायाचे परवाने जारी करण्यात आले होते, प्रत्यक्षात त्या आउटलेट्सचे संचालन दुसरीच कंपनी करत असल्याचे तपासात समोर आले. FDAने एमसीएच्या परिसरातील परमिट रूम, पॅव्हिलियन, मेडिटेरेनियन, ओरिएंटल स्विंग आणि क्लब अँड पेस्ट्री काउंटर या पाच आउटलेट्सवर कारवाई केली आहे. FDAच्या अधिकाऱ्यांनी या सर्व आउटलेट्सची 20 ऑगस्ट रोजी तपासणी केली. तपासणीनंतर अवघ्या एका दिवसात म्हणजे 21 ऑगस्ट रोजी परवाने आणि रजिस्ट्रेशन निलंबित करण्याचे आदेश जारी



करण्यात आले. या कारवाईमागील प्रमुख कारण म्हणजे खाद्य व्यवसायाच्या परवान्याशी संबंधित नियमांचे उल्लंघन. एमसीएला अन्न सुरक्षा आणि मानके कायदा 2006 अंतर्गत चार रेस्टॉरंट्ससाठी स्वतंत्र चार परवाने आणि एका स्नॅक काउंटरसाठी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट देण्यात आले होते. मात्र, FDAच्या तपासणीत दुसरी कंपनी या ठिकाणी खाद्य व्यवसाय चालवत असल्याचे आढळले. विशेष म्हणजे या कंपनीच्या नावावर संबंधित खाद्य व्यवसायासाठी आवश्यक परवाना नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. परवान्याच्या अटींचे उल्लंघन करून परवानगीशिवाय खाद्य व्यवसाय सुरू असल्याचे आढळल्याने FDAने MCAच्या नावावर जारी केलेले चार फूड लायसन्स आणि एक रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट तत्काळ प्रभावाने निलंबित केले.

## थोडक्यात...

### कंगना की दिपके कुणाचं इंग्रजी भारी?

मुंबई : दैनिक संध्या

लोकसभा खासदार आणि बॉलिवूड दिवा कंगना रणावत आपल्या बेधडक वक्तव्यांसाठी ओळखली जाते. ती बऱ्याचदा आपल्या विधानांमुळे चर्चेत येते. अलिकडेच तिने जेन झींना 'जनरेशन गटर' असं म्हटलं होतं. यानंतर तिला प्रचंड ट्रोलिंगचा सामना करावा लागला. अभिनेत्री सोशल मीडियात सक्रीय असते. अभिनेत्रीची इन्स्टाग्राम पोस्ट सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे. या पोस्टमधून तिने 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यावर निशाणा साधला आहे. अभिजीत दिपकेंच्या इंग्लीश स्पीकिंगवरुन अभिनेत्रीने खिल्ली उडवली आहे. सध्या कंगना रणावतची ही पोस्ट सोशल मीडियात व्हायरल होत आहे. कंगना रणावतने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक रिल शेअर केली आहे. यात अभिजीत यांची इंग्रजी बोलण्याची शैली आणि कंगना रणावतच्या इंग्रजी बोलण्याच्या शैलीची तुलना करण्यात आली आहे. दोन्ही व्हिडीओंची तुलना करण्यात आली आहे. या रिलमध्ये त्यांच्या शैक्षणिक कामगिरी आणि इंग्लीश स्पिकींगची तुलना करण्यात आली आहे. या व्हिडीओला कॅप्शनही देण्यात आलं आहे. '12 वी पास कंगना रणावत v/s बॉस्टन यूनिव्हर्सिटीमधून शिक्षण घेतलेले अभिजीत दिपके. एक जबरदस्त आहे तर, दुसऱ्याला रिबूटची गरज', असं म्हटलं आहे.

### सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला

मुंबई : दैनिक संध्या

सामाजिक न्याय विभागाचा निधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पुन्हा एकदा महिला व बाल विकास विभागाकडे निधी वळवला आहे. सामाजिक न्याय विभागाचे 344 कोटी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी वळवले आहेत, सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी महायुती सरकारने पुन्हा सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला आहे. या योजनेतील लाभार्थी महिलांना जुलै महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या तरतुदीतून 344.74 कोटी रुपये महिला व बालकल्याण विभागाकडे वळवण्यात आले आहेत. सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला. लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून या योजनेसाठी सातत्याने सामाजिक न्याय विभाग तसेच आदिवासी विकास विभागाचा कोटींचा निधी वळवला जात आहे. त्याचा परिणाम या दोन्ही विभागांच्या इतर योजनांवर जाणवू लागला आहे.

### राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना आवरा

पुणे : दैनिक संध्या

पुणे महापालिकेत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या धुसफुशीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांच्या वर्तनाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. खट्याळ नगरसेवकांना तुम्ही बोलत नसल्यामुळे हे पत्र पाठवावे लागत असल्याचे घाटे यांनी सांगितले. महापालिका निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले असतानाही महायुतीचा धर्म पाळत राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी, प्रभाग समित्यांमध्ये प्रतिनिधित्व तसेच पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची भूमिका भाजपने घेतली. मात्र, राष्ट्रवादीच्या काही सदस्यांकडून मुख्यमंत्री

# रुपाली चाकणकर मला मेंटली टॉर्चर करतायत, ओटीटीवर दबाव आणतायत

■ पुणे (दै. संध्या)

**दिपाली सय्यद यांचा आरोप**

राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी पोलिसांकडून 19 जणांवर नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर अभिनेत्री आणि शिंदे सेनेच्या नेत्या दिपाली सय्यद यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेत रुपाली चाकणकर यांना प्रत्युत्तर दिले. 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' चित्रपटातील कोणतेही पात्र रुपाली चाकणकर यांचे आहे, असे कुठेही



म्हटलेले नाही. तरीही रुपाली चाकणकर या हा चित्रपट प्रदर्शित होऊ नये म्हणून ओटीटी प्लॅटफॉर्म स्टेकहोल्डर्सवर दबाव टाकत आहेत. पण काही झालं तरी चित्रपट प्रदर्शित होणारच. कारण जेव्हा अडचणी येतात, तेव्हा काही गोष्टी फुलतात, असे दिपाली सय्यद यांनी म्हटले. आम्ही जो 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' चित्रपट करत आहोत, त्यामध्ये मी कुठेही म्हटलेलं नाही की, या चित्रपटात रुपाली चाकणकरांचा रोल आहे. रूपाली चाकणकर स्वतः तो रोल त्यांचा आहे, हे सांगून आपल्यावर हे सगळं ओढवून घेत आहेत. त्यांना मी आतापर्यंत रिस्पेक्टफुली उत्तर दिलेले आहे. त्यांना जर वाटत असेल तर त्यांना 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' चित्रपट माझा पूर्ण झाल्यावर तो दाखवू. रूपाली चाकणकर यांनी बदनामीचा 25 कोटीचा दावा माझ्यावर टाकला. आम्ही आता नोटीस पाठवली आहे आणि 500 कोटींचा दावा रूपाली चाकणकर यांच्यावर टाकला आहे. त्या माझी बदनामी करत आहेत. रुपाली चाकणकर यांची मी काय बदनामी केली? हे त्यांनी सांगावे. असे दिपाली सय्यद यांनी म्हटले. रूपाली चाकणकर यांच्यासंदर्भात मी कुठल्याही अश्लील पोस्ट सोशल मीडियावर टाकलेल्या नाहीत. मी फक्त माझं टीजर पोस्ट केले. तुम्ही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असताना ज्या गोष्टी करायला हव्या होत्या त्या गोष्टी तुम्ही आता करत आहात. दुसरं टीजर आल्यानंतरच तुम्ही गुन्हा दाखल केला. माझा उदरनिर्वाह या चित्रपटावर आहे, मी कलाकार आहे, मला रुपाली चाकणकर मेंटली टॉर्चर करत आहेत, असे दिपाली सय्यद यांनी म्हटले.

# विशाखा राऊतांचे नगरसेवकपद जाणार हे महिन्यापूर्वीच माहिती होतं


## अश्विनी भिडेंची भेट घेतल्यानंतर शिंदेंचे सदा सरवणकर काय म्हणाले?

■ मुंबई (दै. संध्या)

ठाकरेंच्या शिवसेनेच्या नेत्या विशाखा राऊत यांचे जात प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर त्यांच्या नगरसेवकपदावर आता टांगती तलवार आहे. त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्यात यावं यासाठी आता शिंदेंच्या शिवसेनेचे नेते सदा सरवणकर यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांची भेट घेतली. त्यानंतर विशाखा राऊत यांनी केलेल्या आरोपांवरही त्यांनी उत्तर दिलं. विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद जाणार हे आधीच माहिती होतं, असंही सरवणकर म्हणाले.

विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द करण्यासाठी माजी आमदार सदा सरवणकर, त्यांच्या कन्या प्रिया सरवणकर गुरव, शिंदेंच्या शिवसेनेचे गटनेते अमेय घोले आणि तृष्णा विश्वासराव यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांची भेट घेतली. त्यानंतर सदा सरवणकरांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

ठाकरेंच्या विशाखा राऊत यांनी दादरमधील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या वॉर्ड क्रमांक 191 मधून निवडणूक लढवली होती. राऊत यांनी शिंदेंच्या शिवसेनेचे माजी आमदार सदा सरवणकरांची कन्या प्रिया सरवणकर गुरव यांचा पराभव केला होता. मात्र आता विशाखा राऊत



यांचे नगरसेवकपद धोक्यात आलं आहे. आपले नगरसेवकपद जाणार असं एका महिन्याआधीच सदा सरवणकर म्हणाल्याचं विशाखा राऊत यांनी सांगितलं होतं. त्यांना काय स्वप्न पडले होते का? आपले जात प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी एकनाथ शिंदेंनी दबाव आणल्याचा आरोपही विशाखा राऊत यांनी केला होता. त्यावर सरवणकरांनी प्रतिक्रिया दिली. सदा सरवणकर म्हणाले की, "विशाखा राऊत यांचे जात प्रमाणपत्र बोगस होतं, त्यामुळे त्यांचे नगरसेवकपद रद्द होणार हे आधीपासूनच माहिती होतं. आम्ही जवळपास 20 वर्षे एकत्र काम करत होतो. एकवेळेला मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये, 1997 साली त्यांचा मतदारसंघ हा ओबीसी पडला आणि माझा मतदारसंघ ओपन पडला होता. त्यावेळी मी त्यांच्या मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि त्यांनी ओपन असलेल्या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. कारण त्यांच्याकडे ओबीसी प्रमाणपत्र नव्हतं. विशाखा राऊत यांचे जात प्रमाणपत्र बोगस आहे हे जगाला माहिती आहे. त्यामुळे त्या निवडणुकीला उभ्या राहिल्यानंतर त्यांचे पद अवैध ठरेल याची माहिती होती." शिंदेंच्या शिवसेनेचे गटनेते अमेय घोले म्हणाले की, आम्ही जे काही करणार आहोत ते नियमानुसार करणार आहोत आणि त्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. कोण काय बोलतं आणि कशासाठी बोलतं याला काही महत्व नाही. कायदा काय म्हणतोय त्याला महत्व आहे. महापालिकेचे नियम वेगळे आहेत. जे काही नियम आहेत त्यानुसारच कारवाई होणार असं आयुक्तांनी म्हटलं आहे. पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी विशाखा राऊत यांचे कुणबी जात प्रमाणपत्र रद्द केलं आहे. त्यामुळे विशाखा राऊत यांच्या नगरसेवकपदाचा निर्णय आता महापालिका सभागृह घेणार आहे. विशाखा राऊत यांना जातपडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात अपिल करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

# रोजगार हिरावून घेणारे नव्हे, रोजगार देणारे शासन

## *रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम या पुढेही सुरू राहणार – मंत्री प्रताप सरनाईक*

■ मराठी शिकण्यासाठी ४ महिन्याचा कालावधी

■ मराठी भाषा अभियान पुढेही सुरू राहणार

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात रिक्षा व टॅक्सी चालविणाऱ्या अमराठी चालकांना प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या उद्देशाने परिवहन विभागाच्या सामाजिक बांधिलकीतून राबविलेल्या 105 दिवसांच्या विशेष उपक्रमाद्वारे राज्यातील सुमारे 1 लाख 65 हजार 800 रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. हा उपक्रम या पुढेही सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.



मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेस कामगार नेते शशांक राव तसेच कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण या उपक्रमाला रिक्षा-टॅक्सी चालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राची अस्मिता आणि संस्कृतीचा आदर राखण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. ज्या रिक्षा-टॅक्सी चालकांना अद्याप मराठी भाषेचे प्रशिक्षण घ्यायचे आहे, त्यांच्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्या माध्यमातून कार्यशाळा सुरू ठेवण्यात येणार आहेत. मुंबई, ठाणे, भिवंडी, नालासोपारा, वसई-विरार आणि नवी मुंबई या भागांतील प्रशिक्षण केंद्रांची यादी संबंधित आरटीओ अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. प्रशिक्षण केंद्रांची माहिती मिळण्यासाठी आरटीओच्या माध्यमातून स्वतंत्र संपर्क क्रमांक लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. परिवहन विभागाने हा उपक्रम सामाजिक बांधिलकी आणि समाजसेवेच्या भावनेतून राबविला आहे. मात्र, परिवहन विभागाच्या निर्देशांचे उल्लंघन करून कायद्याच्या कक्षेबाहेर जाऊन कोणी काम करत असल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणे ही विभागाची जबाबदारी आहे, असे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले. मराठी भाषा विभागांतर्गत राबविण्यात येणारे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान' सातत्याने पुढे सुरू ठेवण्याचे धोरण असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. मराठी भाषा शिकण्यास इच्छुक असलेल्या रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी कार्यशाळा घेण्यास कामागार नेते शशांक राव यांनीही सहमती दर्शविली आहे.

रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी अतिरिक्त मुदत देण्याबाबत मंत्री सरनाईक म्हणाले की, संबंधित चालकांना एक महिन्याची प्रारंभिक मुदत देण्यात येईल. त्यानंतर आवश्यक असल्यास पुढील तीन महिन्यांचा कालावधी देण्यात येईल. या कालावधीत चालकांना मराठी शिकण्याची संधी दिली जाईल. या प्रक्रियेत संबंधित कायद्यानुसार बॅज निलंबनाची कारवाई होऊ शकते; मात्र या तीन महिन्यांच्या कालावधीत बॅज रद्द केला जाणार नाही. त्यानंतरही मराठी भाषा शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास कायद्यानुसार बॅज रद्द करण्याची कारवाई केली जाऊ शकते, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

मुंबई आणि ठाणे परिसरातील वातावरण बिघडविण्याचा काही समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे सांगून मंत्री सरनाईक यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. रिक्षा-टॅक्सी संघटनांचे पदाधिकारी आणि नेत्यांशी शासन सातत्याने संवाद साधत असून, त्यांच्या सूचनांचा विचार करून कोणावरही चुकीच्या पद्धतीने कारवाई होणार नाही, अशी शासनाची भूमिका असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी शेवटी सांगितले.

# मराठी शिका नाहीतर मुंबई सोडून जा


■ मुंबई (दै. संध्या)

मुंबईतील कांदिवली पश्चिमेत अमराठी रिक्षाचालकांच्या आंदोलनानंतर मनसे (MNS) कमालीची आक्रमक झाली आहे. राज्य शासनाने टॅक्सी आणि रिक्षाचालकांसाठी ग्राहकांशी व्यावहारिक संवादाकरिता केलेल्या मराठी भाषेच्या सक्तीविरोधात अमराठी रिक्षाचालकांनी कांदिवलीत चक्का जाम आंदोलन केले होते. या आंदोलनादरम्यान त्यांनी दाखवलेल्या दादागिरीनंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या रिक्षाचालकांना थेट इशारा दिला आहे. रिक्षाचालकांनी मराठी शिकावी आणि मराठीतच बोलावं. मराठी शिकण्यास आणि बोलण्यास कचरत असाल तर मुंबईतून परत निघून जा, अशा स्पष्ट आणि कडक शब्दांत जाहीर इशारा देणारा फलक मनसेने कांदिवलीतील हिंदुस्तान नाका परिसरात लावला आहे. कांदिवली पश्चिमेच्या लिंक रोड परिसरात, एकता नगरमधील नवीन म्हाडा टॉवरसमोर सोमवारी अमराठी रिक्षाचालकांनी एकत्र येत रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे लिंक रोडवर भीषण वाहतूक कोंडी झाली आणि सामान्य प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. आंदोलनादरम्यान अमराठी रिक्षाचालकांनी दादागिरी करत प्रवासी घेऊन जाणाऱ्या इतर रिक्षाचालकांना धमकावले, तसेच एका मराठी रिक्षाचालकावर हल्ला केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर काही रिक्षांवर दगडफेक करण्यात आली, ज्यानंतर कांदिवली पोलिसांनी दगडफेक करणाऱ्या काहींना ताब्यात घेतले आहे.

# संपादकीय

## पवित्र कुंभ; आरोग्याची उपेक्षा!

'तहान लागल्यावर विहीर खणणे' या म्हणीचा प्रत्यय नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभपर्वाच्या निमित्ताने येत आहे. बहुतांश रस्ते एकाच वेळी खोदून ठेवल्याने दोन्ही शहरांत गोंधळ उडाला आहे. हजारो कोटी रुपयांच्या निविदा केवळ रस्त्यांसाठी काढल्या असताना, कुंभमेळ्यातील आरोग्य सुविधांकडे अद्याप प्रशासनाचे फारसे लक्ष गेलेले दिसत नाही. त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयाचे उदाहरण त्यासाठी पुरेसे ठरावे. कुंभाचे ध्वजारोहण अवघ्या दोन महिन्यांवर आले असताना, प्रशासनाने ऐन वेळी या रुग्णालयाच्या स्थलांतराचा घाट घातला आहे. त्यासाठी पर्यायी जागा अद्यापही निश्चित झालेली नाही. स्थलांतरादरम्यान गावातील रुग्णांचे काय करणार, याचे उत्तर द्यायला कोणी तयार नाही. जेमतेम पाच-सात लाख लोकांची क्षमता असलेल्या त्र्यंबकमध्ये कुंभमेळ्यात लाखो-कोट्यवधी भाविक कसे मावणार, याबद्दलही 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' आहे. पर्वणीकाळात चेंगराचेंगरी वा इतर कटू प्रसंग गुदरल्यास उपचारांचे काय, या प्रश्नावर आरोग्यमंत्री मोघम उत्तरे देतात. 'शासकीय रुग्णालयांची कामे पूर्ण करू. चारशे ते पाचशे खाटांच्या रुग्णालयाचे लोकार्पण करू,' असे ते म्हणतात. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह अडीचशे कोटी रुपयांचा आराखडा तयार असल्याचा दावा करतात. प्रत्यक्षात सध्या पन्नास खाटांच्या रुग्णालयाचा वांधा झाला आहे. कुंभमेळामंत्री एकीकडे 'एअर ॲम्बुलन्स'च्या गप्पा करत असताना, सांगाडारूपी उरलेल्या रुग्णालयांकडे त्यांचे लक्ष जात नाही. प्रभू श्रीरामाच्या भूमीत येताना लोकांनीही 'रामभरोसे'च यावे, असे तर यातून सुचवायचे नाही ना?



सन २००३च्या कुंभमेळ्यात नाशिकच्या सरदार चौकात चेंगराचेंगरी झाली, तेव्हा नाशिक जिल्हा रुग्णालयाचे भाग्य उजळले होते. महापालिकेची काही रुग्णालयेही काही प्रमाणात अद्ययावत झाली होती. मात्र, त्यालाही आता २३ वर्षे उलटली. त्या तुलनेत कुंभमेळ्याचा आवाका कित्येक पटीने वाढला आहे. काही कोटी वगैरे असू द्या; काही लाख लोक येणार असतील (अर्थात, प्रशासनाने त्यांना येऊ दिल्यास), तर त्यांच्यासाठी हजार-पंधराशे खाटा कशा व कुठवर पुरणार? सध्या जिल्ह्यातील सर्व सरकारी रुग्णालये मिळून जेमतेम एकवीसशे खाटांची क्षमता आहे. लसीकरणाचा मुद्दाही दुर्लक्षित करता येणार नाही.

सत्तरच्या दशकात रोगराई पसरल्याने लसीकरणाशिवाय भाविकांना कुंभाची परवानगी नाकारण्यात आली होती. कदाचित हंगामी व्यवस्था वा खासगी रुग्णालये अधिग्रहित करण्यावर आताच्या यंत्रणेची भिस्त असावी. परंतु, त्याच्या पूर्वतयारीबाबतही आनंदीआनंदच दिसतो. आरोग्य क्षेत्र अद्ययावत करून त्याला आजमावून पाहण्याची, सेवाभाव दाखविण्याची संधी आपण दवडत आहोत, हेही लक्षात घेतले जात नाही. सरकारी रुग्णालये भ्रष्टाचाराने पोखरली गेली असल्याने संबंधितांनी किमान पापमुक्तीची संधी म्हणून तरी त्याकडे बघावे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने सरकारी रुग्णालयांचे नशीब फळफळले तर गरिबांची कायमची सोय होईल. राज्यात गावोगावी अशी बरीच रुग्णालये अंथरुणाला खिळून आहेत. त्यांच्या दुर्दैवाने तेथे कुंभमेळा नाही. परंतु, जेथे आहे तेथे तरी कुठे दिवे लागले आहेत? प्रत्येक महत्त्वाच्या धार्मिक स्थळावर किमान शंभर खाटांचे सरकारी वा धर्मादाय रुग्णालय का नाही, हा प्रश्नही कोणाला पडत नाही. शिर्डी, शेगावसारख्या ठिकाणी ते असल्याने देशभरातून येणाऱ्या गरजूंची सोय झाली व तेथील स्थानमहात्म्य वाढण्यास मदतच झाली. नाशिक-त्र्यंबकमध्ये तसे घडल्यास हा महाकुंभ खऱ्या अर्थाने पवित्र अन् गौरवास्पद म्हटला जाईल. तो आरोग्यकुंभ म्हणून ओळखला जाईल. धर्म-अध्यात्माचा हा मेळा जगभरासाठी आदर्श ठरू शकेल, भारतीय संस्कृती-परंपरेच्या लौकिकातही भर पडेल. अर्थात, असे व्हावे अशी सध्या केवळ आशाच बाळगता येईल. बाकी प्रशासनाच्या हाती!

## कितीही प्रयत्न करा पण...

तुमचं घर जगाच्या पाठिवर कुठेही असू द्या मुंग्या काही तुमची पाठ सोडत नाही. बऱ्याचदा असं पाहिलं असेल की अचानक मुंग्या घरात येतात. हवापालट झाला तरी मुंग्या येतात. त्यांना औषध घाला, पाण्याने धुवून टाका, मारा तरीही मुंग्या काही घरात यायच्या बंद होत नाहीत. पुन्हा काही वेळानं त्या येतातच. इतके प्रयत्न करुनही मुंग्या जात का नाहीत. मुंग्या आपल्या घराची पाठ का सोडत नाहीत. नेमकं काय कारण आहे. मुंग्याबाबत काही मजेशीर फॅक्ट जाणून घेऊया.

सिडनी, एक एप्रिल (द कन्वरसेशन) मुंग्या प्रकृतीच्या सर्वात मोठ्या यशोगाथांपैकी एक आहेत. जगभरात त्यांची अंदाजे २२,००० प्रजाती आहेत. विशेषत: उष्णकटिबंधीय ऑस्ट्रेलिया मुंग्यांच्या विविधतेसाठी एक जागतिक केंद्र आहे. काही संशोधकांचा असा विश्‍वास आहे की हा ग्रहावरचा सर्वात समृद्ध मुंग्या जैवविविधतेपैकी एक असू शकतो, केवळ उष्णकटिबंधीय प्रदेशात अंदाजे ५,००० प्रजाती आहेत.

पण जर मुंग्या नैसर्गिक वातावरणात इतक्या आरामात राहू शकतात, तर त्या अनेकदा आपल्या घरांमध्ये आणि अगदी उंच अपार्टमेंटमध्ये का दिसतात? आणि आपण त्यांना बाहेर ठेवण्यासाठी काय करू शकतो? संभावना अशी आहे की तुमच्या आसपास या क्षणीही कुठेतरी एखादी मुंगी असेल. संख्याबळाच्या दृष्टीने मुंग्या पृथ्वीवर प्रचंड प्रभाव टाकतात.

प्रत्येक क्षणी अंदाजे २० क्वाड्रिलियन मुंग्या पृथ्वीवर जिवंत आहेत, म्हणजे २० नंतर १५ शून्य. या हिशोबाने प्रत्येक मनुष्याच्या वाट्याला जवळपास २५ लाख मुंग्या येतात. म्हणून 'माझ्या घरात मुंग्या का आहेत?' याचे संक्षिप्त उत्तर हेच आहे: खूप जास्त मुंग्या आहेत. आपण अशा ग्रहावर राहतो जिथे मुंग्या आपल्यापेक्षा अविश्‍वसनीय संख्येने अधिक आहेत. त्यामुळे काही वेळा त्या आपल्या घरात शिरल्यास आपल्याला आश्‍चर्य वाटायला नको.

मुंग्या घरातच काम करतात (म्हणजे तुमच्या घरातून). मुंग्या त्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या अत्यंत सामाजिक स्वभावाला देतात. कालोनीच्या आत, काही मुंग्या (मादी राणी आणि नर ड्रोन) प्रजननासाठी जबाबदार असतात, तर इतर (कामगार) पिल्लांची काळजी घेणे, स्वच्छता करणे किंवा अन्न शोधणे यासाठी व्यस्त असतात. कामगार मुंग्या नेहमी मादी असतात. मुंग्यांच्या कालोनींमध्ये नेता नसतो. त्या सामूहिक वर्तन आणि झुंडीच्या बुद्धीमत्तेचा उत्कृष्ट नमुना आहेत, जिथे तुलनेने साध्या नियमांचे पालन करणारे व्यक्ती एकत्रितपणे कोणीही करू शकत नाही इतके मोठे कार्य साध्य करू शकतात.

जसे तुमच्या मेंदूमधील एक न्यूरॉन संगीत तयार करू शकत नाही, फुटबॉल खेळू शकत नाही किंवा लेख वाचू शकत नाही, तसेच मेंदू एकत्रितपणे हे सर्व आणि बरेच काही साध्य करू शकतो. एकत्र काम करणाऱ्या मुंग्यांच्या कालोनी अत्यंत परिष्कृत वर्तन करण्यास सक्षम असतात जसे की: कुशल मार्ग तयार करणे, त्यांच्या शरीराने जिवंत पूल बनवणे आणि कवक व एफिड्स (लहान, रस शोषणारे कीटक) यांची ''शेती'' करणे.

मुंग्या काही सहकार्य आधारित कामांमध्ये माणसांपेक्षा चांगले काम करतात. मुंग्यांचा अत्यंत सामाजिक स्वभाव त्यांच्या यशाचा एक मोठा भाग आहे – आणि हा एक प्रमुख कारण आहे की त्या आपल्या घरात प्रवेश करण्यात इतक्या कुशल आहेत. प्रत्येक मुंग्या कालोनीत हजारो धाडसी कामगार असतात ज्यापैकी अनेक सतत नवीन अन्नस्रोत शोधत असतात. जर एखादी मुंगी तुमच्या घरात कोणताही मौल्यवान स्रोत शोधते, तर ती माहिती तिच्या झुंडीतील इतरांसोबत पटकन शेअर करू शकते.

विविध मुंगी प्रजाती संवादासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करतात. जेव्हा एखादी मुंगी अन्नाचा स्रोत शोधते, तेव्हा ती आपल्या झुंडीमध्ये परत येते आणि जाताना फेरोमोनच्या लहान थेंबांचा माग सोडते; हे चिन्ह इतर मुंग्यांना त्यांच्या झुंडीपासून थेट अन्नाच्या स्रोतापर्यंत घेऊन जाते. ही अत्यंत कार्यक्षम संप्रेषण प्रणाली याचा अर्थ असा आहे की एक मुंगी आपल्या हजारो झुंडीतील साथीदारांना कोणत्याही अन्नस्रोताकडे वेगाने आकर्षित करू शकते.

मुंग्या पाण्याच्या शोधातही तुमच्या घरात येऊ शकतात, विशेषत: उन्हाळ्यात. काही प्रजाती ओलसर वातावरणात राहणे पसंत करतात, त्यामुळे त्या बाथरूममध्ये का दिसतात हे समजते. मी एकदा माझ्या ॲक्वेरियम फिल्टरच्या आत संपूर्ण कालोनीला घर बनवताना पाहिले आहे.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | 1 | | | | 9 | 2 |
| | 2 | | 8 | | 7 | | 5 | 1 |
| 9 | 1 | 6 | | | 3 | 4 | | |
| 6 | | | | 3 | | | | |
| | | 8 | 6 | | 1 | 2 | | |
| | | | | 5 | | | | 9 |
| | | 3 | 9 | | | 5 | 4 | 6 |
| 5 | 6 | | 3 | | 4 | | 8 | |
| 8 | 4 | | | | 5 | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०४९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | 2 | 3 | 9 | 6 | 5 | 1 | 7 |
| 3 | 6 | 7 | 1 | 5 | 2 | 9 | 4 | 8 |
| 5 | 9 | 1 | 8 | 4 | 7 | 3 | 6 | 2 |
| 7 | 3 | 5 | 2 | 6 | 8 | 4 | 9 | 1 |
| 9 | 1 | 4 | 7 | 3 | 5 | 8 | 2 | 6 |
| 8 | 2 | 6 | 4 | 1 | 9 | 7 | 3 | 5 |
| 6 | 4 | 8 | 5 | 2 | 3 | 1 | 7 | 9 |
| 1 | 7 | 9 | 6 | 8 | 4 | 2 | 5 | 3 |
| 2 | 5 | 3 | 9 | 7 | 1 | 6 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९९७ – अलजेरियात काटाकाटीत १०० जण ठार झाले.
- २००७ – यूनानमध्ये भीषण वणव्यात ४७ जणांचा मृत्यू झाला तर शेकडो जण गावात अडकल्यानंतर आणीबाणी लागू करण्यात आली.
- २००७ – टेनिस स्टार सानिया मिर्झा आणि स्टार खेळाडू महेश भूपतीने आपापल्या जोडीदारांसोबत मिळून अमेरिकेच्या न्यू हैवनमध्ये खेळल्या गेलेल्या पायलट पेन स्पर्धेत क्रमाने महिला आणि पुरुष दुहेरीचा पुरस्कार जिंकला.

### राष्ट्रीय

- १३०३ – अलाउद्दीन खिलजीने चित्तोर जिंकले
- २००७ – बंगळूरुमध्ये एकाच वेळी ३०० जणांनी मरणोत्तर देहदानाची इच्छा जाहिर केली.

### जन्म

- १९१० – मदर तेरेसा, समाजसेविका; नोबेल पारितोषिक आणि भारतरत्न पुरस्काराने सन्मानित
- १९२२ – प्रा. ग. प्र. प्रधान, भारतीय स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत, पत्रकार व शिक्षणतज्ज्ञ
- १९२७ – बी.व्ही. दोशी, भारतीय आर्किटेक्ट.

### निधन

- १९४८ – कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, मराठी नाटककार, केसरीचे संपादक
- १९५५ – अ. ना. भालेराव, मुंबई मराठी साहित्य संघाचे संस्थापक
- १९९९ – नरेंद्रनाथ, भारतीय टेनिसपटू
- १९५५ – बालन के. नायर, मल्याळी चित्रपट अभिनेते
- २००६ – नूर हसन अली, त्रिनिदाद आणि टोबॅगोचे भारतीय वंशाचे पहिले राष्ट्रपती.

## : SMS :

3. Santa ka 7/12Santa ne 7/12 dekha aur bola - Isme 50 naam hain! Banta bola - Arey ye 7/12 nahi, ye to shaadi ka guest list hai!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.४ | २३.५ |
| अहमदनगर | ३२.४ | २२.५ |
| अकोला | ३६.५ | २५.८ |
| अमरावती | ३४.१ | २५.५ |
| बीड | ३६.३ | २६.३ |
| भंडारा | ३१.९ | २६.१ |
| बुलढाणा | ४३ | ३२ |
| चंद्रपूर | ३६.४ | २६.१ |
| चेन्नई | ४० | २७.७ |
| नवी दिल्ली | ४१.४ | ३२.९ |
| धुळे | ३५.४ | २५.६ |
| गोंदिया | २७.७ | २५.६ |
| जळगाव | ३५.८ | २५.२ |
| कोल्हापूर | २८.८ | २३ |
| लातूर | ३३.१ | २३.६ |
| मुंबई | ३४ | ३०.२ |
| नागपूर | ३२.१ | २६.४ |
| नांदेड | ३५.३ | २५ |
| नंदूरबार | ३२.४ | २४.४ |
| नाशिक | ३०.४ | २३.३ |
| पुणे | २९ | २२.१ |
| पंढरपूर | ३४.६ | २३.७ |
| सातारा | ३०.९ | २२.५ |
| सांगली | ३१.७ | २३.२ |
| सोलापूर | ३४.६ | २४.१ |
| वर्धा | ३४.७ | २६.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर विश्वासाचे वातावरण राहिल. योग्यता, अनुभवाचा फायदा होईल.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर कुटूंबात अनुकूल कार्य होतील. आपले महत्त्व स्वीकारले जाईल. समाजात कामांना सम्मान मिळेल.

**मिथून :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व आर्थिक स्थिती साधारण राहिल. विचार करुन विवेकाने निर्णय घ्यावयास हवे.

**कर्क :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व नोकरीत कार्यकौशल्याचा फायदा मिळेल. पैशात वाढ होईल. वेळेचा सदुपयोग करु शकाल.

**सिंह :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण विचारांनूसार कामे करा. शत्रूंचे षडयंत्र विफल होईल. भागीदारी व्यवसायात घेतले गेलेले निर्णय फायद्याचे ठरतील.

**कन्या :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांकडे दुर्लक्ष करु नका. समृद्धीचे योग येतील. आत्मविश्वास वाढेल.

**तूळ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण ठरविलेली कामे वेळेवर होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पूर्व व्यावसायिक योजना यशस्वी होतील. भौतिक सुख-सुविधेचे साधन मिळेल.

**धनू :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर आर्थिक स्वरुपात दिवस चांगला राहण्याची शक्यता आहे. स्फूर्तिवान जाणवाल.

**मकर :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व कौटूंबिक चिंतेमुळे मन उदास राहिल. अधिक खर्च करु नका, अन्यथा समस्या वाढतील.


**कुंभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व वाहन सुख मिळण्याचे योग आहे. कामकाजात स्थिती लाभदायक राहील.

**मीन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर विशेष प्रयत्नांनी अभिष्ट कार्य पूर्ण होऊ शकतील. शत्रू त्रास देऊ शकतात.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:सौभाग्य ०७:५८:४१ |
| २६ ऑगस्ट २०२६ | करण:तैतिल ०७:५९:२२ |
| बुधवार | करण:गर २०:३७:५८ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:सिंह |
| श्रावण संवत्– १९४८ | चन्द्र:मकर |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – रबिलावल |
| मास– श्रावण | तारीख – १२ |
| ऋतु– सौर शरद | विशेष |
| शुक्ल पक्ष | बुधपूजन |
| तिथि:त्रयोदशी ०७:५९:२२ | ईद – ए – मिलाद |
| नक्षत्र:श्रवण २४:४७:४१+ | ऋक श्रावणी |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५०



**आडवे शब्द**

१. स्वामी विवेकानंद यांचे जगप्रसिद्ध भाषण येथे झाले
४. प्रस्तावनेतच वेळ घालवणे (वा.प्र.)
१३. गुरुद्वारातील अन्नछत्र
१४. रतीचा पती
१५. रोख रक्कम
१६. तलाव
१७. गहिवरणे
१९. जोंधळ्याची वाळलेली ताटे
२१. भ्रमर
२३. कागद मोजण्याचे एक माप
२५. अनौरस (हिंदी)
२७. महिना
२८. शिळ्या ताकाची चव
२९. गायीचे पिल्लू
३१. रामकथा
३२. हाक
३३. पत्नी
३५. माणूस
३६. परमेश्वर
३८. तापाची चाहूल
४०. मृग
४१. दाब (इंग्रजी)
४२. अतिशय श्रम
४३. भाव, किंमत
४६. शांत
४८. आशीर्वाद
४९. मोटार
५०. शक्ती
५१. प्राण, जीव (हिंदी)
५३. ढोंगी एकाग्रता
५५. पैठणची प्रसिद्ध साडी
५६. घड्याळातील तिसरा काटा
५७. निर्मनुष्य, ओसाड
५९. सर्वांत कमी किमतीचे जुने नाणे, एक आडनाव
६०. केसाचा कृत्रिम रंग
६१. निबर, जून
६५. गायनकला सांगणारा वेद
६६. एक श्वासरोग
६८. जो संकटाला घाबरतो त्याच्यावरच ती ओढतात (म्हण)
७२. क्रिकेटमधील धावपळ
७३. साधना करणारा
७४. प्रचलित बोधवाक्य
७५. आक्षेप
७८. वडिलांचे संबोधन
८०. वेखंड
८१. आणि
८२. दिवस
८३. प्रशंसेचा उद्गार
८४. सान्निध्य
८५. नेता
८६. ऋतु, हंगाम
८७. तोंड (सं.)

**उभे शब्द**

१. सीमोल्लंघन
२. ज्यावर छापतात तो
३. निर्धन लोक
४. मऊ पडणे
५. रग, मस्ती
६. शिखांचे गुरु
७. घरगुती संबंध
८. टपाल
९. शेख-चुरमुरे इ. विकणारा
१०. आभा
११. कपाळ
१२. चिंचगुळ घालून केलेली काकडी वगैरेची कोशिंबीर
१८. ओलसर
२०. शंकराचे वाद्य
२२. गुरांना चरण्यासाठीचे कुरण
२४. तमाशातील प्रश्नोत्तरे
२५. आवाज, छंद
२६. समुदाय
२७. व्यंकटेश माडगूळकरांची 'माणसे' या भागातील
२८. लग्नात द्यायची वरदक्षिणा
३०. मालिका, ठराविक कालावधी
३२. तात्पुरता लाकडी पूल
३४. संकट
३७. वरपांगी
३९. कमतरता
४०. उगीचच
४१. माया, स्नेह
४३. प्रत्येक
४४. आळशी, अजागळ
४५. धर्मार्थ देणे
४६. शंकराचे एक नाव
४७. उणे
४८. जंगल
४९. बायका साडी घेताना रंग, पोताबरोबर या दोन गोष्टी बघतात
५०. निवारा (हिंदी)
५२. आभाळ
५३. शहरी सार्वजनिक वाहन
५४. एखादी गोष्ट मिळवण्यासाठी पाठपुरावा करणे
५५. पलीकडे
५८. झाडझूड करणारा नोकर
६०. कमळांचे तळे
६२. देवीचा उपासक
६३. देवपूजेचे पात्र
६४. कोर्टातील जबानी
६७. श्रीकृष्णाचे एक नाव
६८. पुरुषांच्या कानातील दागिना
६९. पर्ण
७०. लग्न न केलेला
७१. एकत्र वास्तव्य
७३. भक्ष्य
७६. दाक्षिणात्य पाणीदार आमटी
७७. डोळे
७९. कुबड
८०. नवरी
८३. वर्ण, रंग

**जम्बो शब्दकोडे क्र. १०४९ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.ठाम ३.राजबिंडा ६.अंतकाल ९.कदम १२.रजत १४.नदी १५.गल १६.ताव मारणे १८.बलभीम १९.वास २०.मन २२.सल २३.सिंगार २६.यमन २८.रावबहादूर ३०.गजानन ३१.वातायन ३२.सारा ३३.कृण ३४.रात ३५.माह ३८.पंकज ३९.सजग ४०.मतलबी ४२.परात ४४.निरामय ४५.गरजवंत ४७.काष्ठ ४८.व ४९.दामट ५१.मात ५२.नराधम ५३.असूया ५५.रग ५७.बरणी ५८.रुपे ६०.चरक ६२.रजनी ६४.पलक ६५.उपकारक ६७.मानिनी ६८.कयाधु ६९.तारक ७१.मुचलका ७३.विप्र ७५.अ ७६.कर ७७.नागरमोथा ७९.प्रकांड ८०.टाकणखार ८१.रसद ८२.सतत

उभे उत्तर : १.ठार बहिरा २.मजल ४.जन ५.बिंदी ६.अंग ७.तलम ८.लता ९.कमाल १०.दर ११.मणेर १३.तभी १७.वसनवात १९.वार २१.नयन २३.सिंदूर २४.गार २५.अजाण २७.जयविजय २९.वसाहत २९अ.बरा ३०.गपचूप ३४.राजनिष्ठा ३५.मामलेदार ३६.डबीर ३७.कृपावंत ३८.पंत ३९.समयसूचकता ४१.लगट ४३.रातराणी ४६.जमा ४७.कामरुप ५०.मगर ५२.नरकयातना ५४.यार ५६.कनीनिका ५७.बलक ५९.पेकाट ६१.कनक ६३.जमालगोटा ६६.कुमुदिनी ७०.रमाकांत ७२.पारखा ७३.विरस ७४.प्रमोद ७६.कण ७८.गर ७९.प्रत

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ‘प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू २.०’द्वारे एआय प्लसचा ‘नोव्हा २ पॉवर’ सादर

**पुणे : दैनिक संध्या**

एआय प्लस स्मार्टफोनने आपल्या ‘नोव्हा २’ मालिकेतील नवीन ‘नोव्हा २ पॉवर’ स्मार्टफोन ‘प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू २.०’ या उपक्रमाद्वारे सादर केला आहे. बाजारात उपलब्ध होण्यापूर्वीच स्मार्टफोनची रचना, रंगसंगती आणि कार्यक्षमतेशी संबंधित माहिती जाहीर करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत परीक्षक, आशय निर्माते, पत्रकार, तंत्रज्ञानप्रेमी तसेच संगणक सुरक्षा क्षेत्रातील नैतिक परीक्षकांना स्मार्टफोनची स्वतंत्र चाचणी घेण्याची संधी मिळणार आहे. ‘प्रोजेक्ट ओपन रिव्ह्यू’च्या पहिल्या पर्वाला ७०० हून अधिक नोंदणी मिळाल्यानंतर आता दुसऱ्या पर्वात नैतिक संगणक सुरक्षा परीक्षकांचाही प्रथमच समावेश करण्यात आला आहे. उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी त्याची स्वतंत्र चाचणी आणि पारदर्शक परीक्षण व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. प्रेरणादायी रचना आणि दीर्घकाळ टिकणारी कार्यक्षमता या संकल्पनेवर ‘नोव्हा २ पॉवर’ची निर्मिती करण्यात आली आहे. हा स्मार्टफोन गोल्डन ब्लू फ्युजन आणि ब्लू फ्युजन या दोन रंगसंगतींमध्ये सादर करण्यात आला आहे. दोन्ही रंगांमध्ये परस्परविरोधी छटांचा प्रवाही संगम असून, त्यामुळे स्मार्टफोनला वेगळी आणि उठावदार ओळख मिळते. कार्यक्षमतेच्या दृष्टीने ‘नोव्हा २ पॉवर’मध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी ७१०० हा ६ नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रियक देण्यात आला आहे. सातत्यपूर्ण कार्यक्षमता आणि ऊर्जेचा कार्यक्षम वापर यांचा समतोल साधण्याच्या उद्देशाने या प्रक्रियकाची रचना करण्यात आली आहे.

### निसस फायनान्सकडून NIFCOT1 द्वारे संस्थात्मक रिअल इस्टेटचे टोकनायझेशन

**पुणे : दैनिक संध्या**

निसस हाय यिल्ड ग्रोथ फंडच्या माध्यमातून समर्थित NIFCOT1 या पहिल्या टोकनाइज्ड ऑफरचे लाँच करून निसस फायनान्स सर्व्हिसेस कंपनी लिमिटेडने संस्थात्मक रिअल इस्टेट गुंतवणुकीला ब्लॉकचेन पायाभूत सुविधांशी जोडण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. डिजिटल ॲसेट मार्केटप्लेस Toyow सोबतच्या भागीदारीतून ही ऑफर सादर करण्यात आली असून, नियमनाधीन रिअल-वर्ल्ड ॲसेट्स (RWA) गुंतवणुकीसाठी 500 दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या बहु-टप्प्यांच्या रोडमॅपची सुरुवात करण्यात आली आहे. निसस फायनान्सच्या दुबईस्थित DIFC-नियमनाधीन निसस हाय यिल्ड ग्रोथ फंडद्वारे NIFCOT1 ला पाठबळ मिळाले आहे. हा फंड GCC आणि EMEA प्रदेशांतील पूर्ण झालेले, पूर्व-भाडेकरार असलेले तसेच नियमित उत्पन्न देणाऱ्या निवासी आणि व्यावसायिक रिअल इस्टेट प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करतो. स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) मार्फत संरचित करण्यात आलेले NIFCOT1 हे फंडाशी संबंधित टोकनाइज्ड आर्थिक हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करते. पहिल्या ऑफरमध्ये 1 लाख डिजिटल मालकी टोकन्स असून, त्यांचे प्रारंभिक इश्यू मूल्य 50 दशलक्ष अमेरिकी डॉलर आहे. ही ऑफर प्रस्तावित 500 दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या व्यापक रोडमॅपचा पहिला टप्पा आहे.

### शेततळ्यामध्ये पडून होणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी उपाययोजना जारी

**पुणे : दैनिक संध्या**

मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे घटकाची अंमलबजावणी करिता मार्गदर्शक सुचनानूसार शेततळयामध्ये पडून जीवित हानी सारख्या होणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी कृषी विभागाकडून जारी करण्यात आलेल्या उपाययोजनांचे पालन करावे, आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे. त्याअन्वये शेततळ्याभोवती मजबूत व सुरक्षित कुंपण करणे, जेणेकरून लहान मुले, अनधिकृत व्यक्ती व जनावरे अनावधानाने शेततळ्यात प्रवेश करणार नाहीत. तारेचे कुंपण करणे संबंधित शेतकऱ्यास आर्थिकदृष्ट्या शक्य नसल्यास, शेततळ्याभोवती स्थानिक हवामान व जमिनीच्या परिस्थितीस अनुकूल अशा काटेरी, संरक्षक वनस्पतींची लागवड करून जैविक कुंपण करण्यात यावे जेणेकरून कोणीही अनावधानाने शेततळ्यात प्रवेश करणार नाही. शेततळ्याच्या सुरक्षित भागावर आपत्कालीन परिस्थितीत पकडण्यासाठी उपयोगी पडतील असे काठावर गाठी मारलेले मजबूत दोरखंड लावावेत. शेततळ्याच्या दर्शनी भागात "धोका शेततळ्यात बुडून जीवितहानी होऊ शकते" अशा आशयाचा स्पष्ट, मोठ्या अक्षरातील व सहज दिसणारा चेतावणी फलक लावावा आणि त्यावर स्थानिक रुग्णवाहिका (108) व तसेच संबंधित पोलीस ठाण्याचा संपर्क क्रमांक ठळक अक्षरात नमूद करावा.

# म्युच्युअल फंड उद्योगातील ऐतिहासिक भागीदारी

## मिडासएक्स आणि एमएफ युटिलिटीज इंडिया यांच्यात सहकार्य; देशभरातील वितरकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित संपत्ती तंत्रज्ञान उपलब्ध

■ पुणे (दै. संध्या)



भारतातील कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित व्यावसायिक ते व्यावसायिक ते ग्राहक बहुविध मालमत्ता संपत्ती तंत्रज्ञान व्यासपीठ असलेल्या मिडासएक्सने, देशभरातील सर्व म्युच्युअल फंड वितरकांसाठी आपले बहुविध मालमत्ता संपत्ती व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी एमएफ युटिलिटीज इंडियासोबत विशेष धोरणात्मक भागीदारी केली आहे. या भागीदारीमुळे म्युच्युअल फंड वितरकांना मिडासएक्सच्या एकात्मिक तंत्रज्ञान प्रणालीच्या माध्यमातून म्युच्युअल फंड, आंतरराष्ट्रीय आणि भारतीय समभाग, कंपन्यांच्या मुदत ठेवी, तारण ठेवलेल्या समभागांच्या आधारे कर्ज, असूचीबद्ध रोखे, रोखे, एमएलडी आणि इतर आर्थिक उत्पादने उपलब्ध करून देणे आणि त्यांचे वितरण करणे शक्य होणार आहे. वितरकांना अधिक व्यापक उत्पादन संच, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान क्षमता आणि विस्तारक्षम संपत्ती व्यवस्थापन व्यवसाय उभारण्याची क्षमता उपलब्ध करून देणे हा या भागीदारीचा उद्देश आहे.

मिडासएक्स सध्या २ हजारांहून अधिक म्युच्युअल फंड वितरकांसोबत कार्यरत असून, ७ लाखांहून अधिक गुंतवणूकदारांना सेवा देत आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्तरातील शहरांसह देशभरातील १६० हून अधिक शहरांमध्ये २.५ लाख कोटी रुपयांहून अधिक मालमत्तेचे व्यवस्थापन केले जात आहे.

मिडासएक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आकाश बन्सल म्हणाले, “भारताच्या संपत्ती निर्मितीच्या पुढील टप्प्याला आधीपासूनच गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केलेल्या व्यक्तींना सक्षम करण्याची गरज आहे. म्युच्युअल फंड वितरकांकडे गुंतवणूकदारांशी असलेले संबंध आणि व्यापक पोहोच आहे. हे संबंध विविध उत्पादने, बाजारपेठा आणि भौगोलिक क्षेत्रांपर्यंत विस्तारण्यासाठी त्यांना भविष्यासाठी सज्ज, आधुनिक आणि परवडणारे तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे हे मिडासएक्सचे काम आहे. भारतातील शेवटच्या टप्प्यापर्यंतच्या म्युच्युअल फंड वितरकांसाठी बहुविध मालमत्ता संपत्ती तंत्रज्ञान परवडणारे आणि सहज उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एमएफ युटिलिटीज इंडियासोबतची आमची भागीदारी हे महत्त्वाचे पाऊल आहे.”

## एससी, एसटी, ओबीसींसह वंचितांना खासगी क्षेत्रातही प्रतिनिधित्व मिळावे : डॉ. हुलगेश चलवादी

### ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षणास 'आरपीआय'चे समर्थन

■ पुणे (दै. संध्या)

देशातील खासगी क्षेत्रातही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच अन्य वंचित घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य प्रतिनिधित्व आणि समान संधी मिळाली पाहिजे, अशी भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आ) राष्ट्रीय कार्यकारिणीत मांडण्यात आली आहे. सामाजिक न्याय आणि समान संधीच्या धोरणाची अंमलबजावणी केवळ सरकारी क्षेत्रापुरती मर्यादित न राहता खासगी क्षेत्रातही होणे आवश्यक आहे, अशी पक्षाची भूमिका असल्याचे आरपीआयचे प्रदेश उपाध्यक्ष आणि बहुजन नेते डॉ.हुलगेश चलवादी यांनी स्पष्ट केले आहे.

देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात वंचित समाजघटकांचा समान सहभाग असणे गरजेचे आहे. शिक्षण, रोजगार, उद्योग, व्यवस्थापन आणि निर्णय प्रक्रिया या सर्व क्षेत्रांमध्ये सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना संधी मिळाल्यास सामाजिक विषमता कमी होण्यास मदत होईल.खासगी कंपन्यांमध्ये भरती व पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता वाढवून वंचित घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी ठोस धोरण आखण्याची गरज असल्याचे देखील त्यांनी नमूद केले. सामाजिक न्याय हा केवळ राजकीय मुद्दा नसून तो संविधानिक मूल्यांचा महत्त्वाचा भाग आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

SC, ST, OBC आणि अन्य वंचित घटकांच्या हक्कांसाठी आरपीआय सातत्याने आवाज उठवत राहील. समानता, प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायासाठी पक्षाचा संघर्ष पुढेही सुरू राहील, असे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री मा.डॉ.रामदास आठवले साहेबांनी स्पष्ट केले असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

केंद्र सरकारच्या २०२४-२५ च्या आकडेवारीनुसार, १ जानेवारी २०२४ रोजी केंद्रीय सरकारी सेवांमध्ये SC समाजाचे प्रतिनिधित्व १६.८४%, ST ८.७०% आणि OBC २६.३२% होते. ही आकडेवारी सरकारी क्षेत्रातील प्रतिनिधित्वाची स्थिती दर्शवते. मात्र खासगी क्षेत्रातील याबाबतची केंद्र सरकारकडे अधिकृत राज्यनिहाय किंवा क्षेत्रनिहाय आकडेवारी उपलब्ध नाही. जणगणनेच्या माध्यमातून ही आकडेवारी गोळा करीत ती सरकारला सार्वजनिक करता येईल, जेणेकरून वंचित घटकांना खासगी क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी योग्य धोरणांची आखणी करता येईल, असे डॉ.चलवादी म्हणाले.

#### मराठा आरक्षणाला आरपीआयचे समर्थन!


ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षणाला पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे. गरीब मराठा बांधवांना आरक्षण मिळालेच पाहिजे, ही पक्षाची सुरुवातीपासूनची स्पष्ट भूमिका आहे. सरकार याविषयी अत्यंत संवेदनशील असून मराठा आरक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहे, असे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री मा.डॉ. रामदास आठवले यांनी स्पष्ट केल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

## हिलिंग हँड्स क्लिनिक पुढील १८ महिन्यांत १०० केंद्रांपर्यंत विस्तार करणार

■ पुणे (दै. संध्या)

हिलिंग हँड्स क्लिनिक ही प्रोक्टॉलॉजी आणि ॲनोरेक्टल केअर क्षेत्रातील विशेष संस्था आपल्या पुढील वाढीच्या टप्प्यात प्रवेश करत आहे, जिथे पुढील दोन वर्षांत भारतभरात आपली केंद्रे ४० वरून १०० पर्यंत वाढवण्याची योजना आखली आहे. संपूर्ण नेटवर्कमध्ये सातत्यपूर्ण, उच्च-दर्जाची वैद्यकीय सेवा देण्यासाठी आवश्यक असलेल्या क्लिनिकल, तंत्रज्ञान आणि ऑपरेशनल यंत्रणा अधिक मजबूत करताना विशेष ॲनोरेक्टल उपचार रुग्णांच्या अधिक जवळ आणणे हा या विस्ताराचा उद्देश आहे.

एल कॅटरटनच्या ३० दशलक्ष डॉलर्स गुंतवणुकीच्या पाठिंब्याने होणारा हा विस्तार पहिल्या आणि दुसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये विशेष ॲनोरेक्टल उपचारांची उपलब्धता सुधारण्यावर भर देईल. तसेच हिलिंग हँड्स क्लिनिकला व्यापक विशेष आरोग्यसेवा प्लॅटफॉर्म म्हणून विकसित करण्यास मदत करेल. ही संस्था भारतभरात ६० नवीन केंद्रे सुरू करण्याची योजना आखत आहे, ज्यामुळे संस्थेची उपस्थिती १०० पेक्षा जास्त नवीन पिन कोड्समध्ये विस्तारणार आहे. हिलिंग हँड्स क्लिनिकची सुरुवात पुण्यातील एका छोट्या बाह्यरुग्ण (ओपीडी) केंद्रापासून झाली होती. आता



■ समर्पित प्रोक्टॉलॉजी हॉस्पिटल सुरू करणार

प्रमुख केंद्राच्या पाठिंब्याने आणि ८०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या टीमसह त्याचे ४० केंद्रांच्या जाळ्यात रुपांतर झाले आहे. हे क्लिनिक सध्या दरवर्षी ५०,००० नवीन रुग्णांवर उपचार करते.

या विस्ताराचा भाग म्हणून, हिलिंग हँड्स क्लिनिक पुढील १८ महिन्यांत पुण्यात एक समर्पित सुपर-स्पेशलिटी प्रोक्टॉलॉजी हॉस्पिटल सुरू करण्याची योजना आखत आहे. हे हॉस्पिटल गुंतागुंतीच्या आणि वारंवार उद्भवणाऱ्या आजारांवर उपचार करण्यासाठी समर्पित पायाभूत सुविधा प्रदान करेल. तसेच प्रगत उपचार पद्धती, क्लिनिकल संशोधन, सर्जन प्रशिक्षण आणि विशेष रुग्ण सेवेला पाठिंबा देईल. हिलिंग हँड्स क्लिनिकचे संस्थापक आणि ॲनोरेक्टल सर्जन डॉ. अश्विन पोरवाल म्हणाले, "प्रोक्टॉलॉजीला इतर प्रत्येक वैद्यकीय क्षेत्राप्रमाणे सखोलता, सन्मान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन मिळायला हवा.

## सलग तिसऱ्या तिमाहीत मोबिक्विक नफ्यात; PAT 7.6 कोटी रुपये

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीच्या डिजिटल वॉलेट आणि फिनटेक कंपन्यांपैकी एक असलेल्या वन मोबिक्विक सिस्टिम्स लिमिटेड (मोबिक्विक)ने 30 जून 2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा नोंदवत 7.6 कोटी रुपयांचा करपश्चात नफा (PAT) मिळवला आहे. आर्थिक वर्ष 2026 च्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत कंपनीच्या नफ्यात 49.5 कोटी रुपयांची सकारात्मक सुधारणा झाली आहे.

नफाक्षमतेतील सातत्य, खर्चावरील नियंत्रण आणि पेमेंट्स तसेच वित्तीय सेवांमधील सुधारलेल्या मॉनेटायझेशनच्या जोरावर मोबिक्विकने आर्थिक वर्ष 2027 ची सुरुवात दमदार केली आहे. तिमाहीत कंपनीचा कॉन्ट्रिब्युशन प्रॉफिट 66 टक्क्यांनी वाढून 128.6 कोटी रुपये झाला. कंपनीचे कामकाजातून मिळणारे उत्पन्न 281.5 कोटी रुपये राहिले असून, त्यात वार्षिक 4 टक्के वाढ झाली. एकूण उत्पन्न 289.2 कोटी रुपये झाले, जे मागील वर्षाच्या तुलनेत 3 टक्क्यांनी अधिक आहे. याच काळात डायरेक्ट कॉस्टमध्ये 21 टक्के घट झाली. आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीत कंपनीचा EBITDA 15.8 कोटी रुपये राहिला. मागील वर्षाच्या तुलनेत EBITDA मध्ये 47 कोटी रुपयांची सुधारणा झाली आहे.

## एलअँडटी फायनान्सकडून जसप्रीत बुमराहसह गोल्ड लोन मोहिमेचे अनावरण

■ पुणे (दै. संध्या)

एलअँडटी फायनान्स लि. (एलटीएफ) या देशातील आघाडीच्या रिटेल फायनान्स कंपनीने आपला ब्रँड अँबेसेडर जसप्रीत बुमराह यांच्यासह ‘कोई भी सपना होल्ड मत करो, एलअँडटी फायनान्स गोल्ड लोन करो’ यागोल्ड लोन मोहिमेचे अनावरण केले. या मोहिमेद्वारे, एलटीएफ आपल्या गोल्ड लोन (सुवर्ण कर्ज) ऑफरिंग्जबद्दल जागरूकता वाढवेल. तसेच, नागरिक, सूक्ष्म-उद्योजक आणि कुटुंबांना त्यांच्या पडून असलेल्या सोन्याचे मूल्य अनलॉक करून त्यांची प्रगती, आकांक्षा आणि स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सक्षम करेल.

१५ ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणाऱ्या आगामी भारत विरुद्ध श्रीलंका कसोटी मालिकेदरम्यान या टीव्हीसी प्रदर्शित केल्या जातील. या मालिकेसाठी ‘को-प्रेझेंटिंग' पार्टनर म्हणून एलटीएफ सामन्यांदरम्यान ऑन-ग्राउंड आणि टीव्ही चॅनेल्सवर या मोहिमेचा प्रचार करेल. या टीव्हीसी सोनी टीव्ही ब्रॉडकास्ट नेटवर्कच्या नऊ लिनियर टीव्ही चॅनेल्सवर प्रसारित केल्या जातील.

एलटीएफचे पूर्ण-वेळ डायरेक्टर आणि चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्री. राजू दोडती म्हणाले, “आमच्या लक्ष्य २०३१ धोरणांतर्गत एलअँडटी फायनान्सचे रिस्क-फर्स्ट, टेक-फर्स्ट आणि एआय-नेटिव्ह रिटेल फायनान्शियल संस्थेमध्ये रूपांतर होत असताना गोल्ड फायनान्स आमच्या विकासाच्या अजेंड्यातील एक महत्त्वाचा घटक ठरत आहे. याच गतीचे प्रतिबिंब म्हणजे, आमचा उच्च परतावा देणारा आणि सुरक्षित असलेला गोल्ड लोन पोर्टफोलिओ आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत वार्षिक आधारावर १८२ टक्के प्रभावी वाढ नोंदवत ३,८२९ कोटी रूपयांवर पोहोचला आहे, जो आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीत १,३६० कोटी रूपये होता. याला आमच्या ३४३ सक्रिय गोल्ड फायनान्स शाखांचे पाठबळ लाभले आहे आणि चालू आर्थिक वर्षात एकूण गोल्ड फायनान्स शाखांची संख्या ८०० हून अधिक करण्याचा आमचा मानस आहे. ही मोहीम आम्हाला नव्या बाजारपेठांमध्ये पोहोचण्यास, ग्राहकांसोबत नाते अधिक दृढ करण्यास आणि येत्या वर्षांत सातत्याने उच्चांकी वाढ नोंदवण्यास मदत करेल.” कंपनीने आठ राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातील प्रमुख बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी एकात्मिक विपणन मोहिमेची सुरुवात केली आहे. याद्वारे एलटीएफच्या जवळपास १५० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांशी संपर्क साधला जात आहे.

# ‘मानस गुरुप्रसाद’ रामकथेचा आठवा दिवस भक्ती, ज्ञान आणि साधेपणाच्या संदेशाने संपन्न


## तुळशी जन्मोत्सव भक्तिभावाने साजरा; गुरु-परंपरा, ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानावर बापूंचे चिंतन

■ पुणे (दै. संध्या)

अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाच्या सँडर्स थिएटर मेमोरियल हॉलमध्ये आयोजित ‘मानस गुरुप्रसाद’ रामकथेचा आठवा दिवस भक्ती, गुरु-परंपरा, ज्ञान, साधेपणा आणि आधुनिक तंत्रज्ञानावरील चिंतनाने संपन्न झाला. यावेळी यावर्षीचा तुळशी जन्मोत्सवही भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

कथेच्या आठव्या दिवशी सकाळच्या सत्रातील शेवटच्या भाषणात चित्रकूट कामदगिरी परिक्रमा परिसरातील महंत श्री पूज्य राम हृदयदास जी महाराज यांनी बापूंच्या कार्याचे कौतुक केले. “बापूंसारखा पुत्र लाभल्याने भारतमातेला अभिमान वाटेल,” असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

बापूंच्या दरबारातील प्रेम, माया आणि स्नेहाचा उल्लेख करताना त्यांनी प्रत्येकासाठी या दरबाराचे दरवाजे खुले असल्याचे सांगितले. “चित्रकूट हे असे ठिकाण आहे, जिथे चोहीकडे दरवाजे



आहेत. बापूंच्या दरबारात कोणालाही प्रवेश मिळतो. बापू प्रेम, माया आणि स्नेह देतात,” असे ते म्हणाले.

बापूंच्या उपस्थितीमुळे हार्वर्डमधील सभागृहही राजमहाल आणि रामाच्या निवासस्थानासारखे भासत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. “जिथे बापू बसतात, तेच एकत्र येण्याचे ठिकाण आहे,” असेही त्यांनी नमूद केले. कथेच्या प्रारंभी बापूंनी साकेतचे रहिवासी पंडित रामकिंकरजी महाराज यांच्या विचारांचा संदर्भ देत, “गीतेत योग आहे, रामचरितमानसात साधना आहे आणि हार्वर्डमध्ये ज्ञानाची पूजा केली जाते,” असे सांगितले. हार्वर्ड विद्यापीठाच्या परिसरात रामकथेच्या माध्यमातून ज्ञान आणि मनाच्या विज्ञानाचा संवाद घडत असल्याचे सांगताना बापूंनी, “हार्वर्डचे ज्ञान मानसशास्त्राला भेटायला आले आहे,” असे म्हटले. ज्ञान केवळ सिद्धांतापुरते मर्यादित न राहता त्याचा व्यवहाराशी संबंध असणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगाचाही संदर्भ देताना मानवी मन आणि हृदयाला हानी होत नसेल, तर तंत्रज्ञानाचा स्वीकार करता येईल, असे त्यांनी सांगितले. प्रत्येकाचे मनमोकळेपणाने ऐकले, तर प्रत्येक व्यक्तीकडून काहीतरी नवीन शिकता येते, असेही त्यांनी नमूद केले.

रामकथा मांडताना ताजेपणा आणि साधेपणाला महत्त्व असल्याचे बापूंनी सांगितले. “तुम्ही ताजेपणा आणि साधेपणा आणल्यास, हनुमानजी परवानगी देतील,” असे ते म्हणाले. कथेत अलंकाराला विरोध नसला तरी त्यामागील भाव आणि साधेपणा अधिक महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संतांच्या स्वभावाविषयी बोलताना, “साधूचे एक वैशिष्ट्य म्हणजे तो लाजाळू असतो,” असे त्यांनी सांगितले. “जय श्री राम ही एक आंदोलनात्मक हाक आहे, तर जय सियाराम ही आनंदाची हाक आहे,” असे सांगत त्यांनी दोन्ही घोषणांमागील भावार्थही स्पष्ट केला.

गुरु-परंपरेचे महत्त्व अधोरेखित करताना बापूंनी “माझे गुरु हेच माझे अर्पण” असे सांगितले. गुरु हा सर्वात मोठा प्रसाद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गुरुप्रसादामुळे शंका दूर होतात, साधूचा प्रसाद व्यक्तीला ध्येयप्राप्तीच्या दिशेने घेऊन जातो, तर समर्थ गुरु शिष्याला ज्ञानाची व्यापक परंपरा प्रदान करतात, असे त्यांनी सांगितले. “गुरु गोविंद देतात. समर्थ गुरु चारही वेद देतात,” असे बापूंनी नमूद केले. ऋषी, मुनी, देव आणि गुरु यांच्या प्रसादाची वेगवेगळी अनुभूती स्पष्ट करताना त्यांनी ऋषींचे अर्पण निःशब्द असते, तर देव स्वर्गाचा प्रसाद देतात, असे सांगितले. चुकीच्या संगतीचा परिणामही तितकाच गंभीर असतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले. धर्मग्रंथ आणि ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचे महत्त्व अधोरेखित करताना बापूंनी वेदांचे ज्ञान अधिक व्यापक पद्धतीने समाजापर्यंत पोहोचण्याची आवश्यकता व्यक्त केली.

वेदांची भाषा आणि गुंतागुंत यामुळे ते प्रत्येक घरापर्यंत पोहोचू शकले नाहीत, तर इतर विचारधारांचे ग्रंथ तुलनेने अधिक सहजतेने लोकांपर्यंत पोहोचले, असे त्यांनी सांगितले. गुरु उपनिषदांचे ज्ञानही प्रदान करतात आणि संत आपल्या शिष्याला जीवनातील गूढ सार समजावून देतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

किष्किंधाकांडातील शबरीच्या आश्रमातील प्रसंग, नवधा भक्ती, शबरीला प्राप्त झालेला मोक्ष, हनुमानजींसोबतची मैत्री, वालीचा अंत आणि अंगदाला युवराजपद देण्याच्या घटनांचाही आढावा घेण्यात आला. यानंतर सुंदरकांडातील हनुमानजींचा सीतेच्या शोधासाठी लंकेकडे प्रवास, लंका दहन आणि परत आगमन यांचे वर्णन करण्यात आले. लंकाकांडाच्या सुरुवातीला समुद्रावर सेतू बांधून राम आणि त्यांचे सैन्य लंकेत पोहोचल्याचा प्रसंगही कथेत मांडण्यात आला. तहाचा प्रस्ताव अपयशी ठरल्यानंतर युद्ध अटळ झाल्याचे स्पष्ट करण्यात आले. भक्ती, गुरु-कृपा, ज्ञान, साधेपणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या संदर्भातील चिंतनामुळे ‘मानस गुरुप्रसाद’ रामकथेचा आठवा दिवस विशेष ठरला. रामकथेच्या पुढील टप्प्यातील कथानुभवासाठी उद्याचा दिवस महत्त्वाचा असून, रामकथेच्या प्रारंभाचा दिवस उद्या साजरा होणार आहे.

#### रामचरितमानसातील प्रमुख प्रसंगांचा आढावा

आठव्या दिवसाच्या कथेत रामचरितमानसातील विविध कांडांमधील महत्त्वपूर्ण प्रसंगांचा संक्षिप्त आढावा घेण्यात आला. अयोध्याकांडातील मंगलाचरणापासून भगवान रामांचा वनवास, चित्रकूट भेट, अरण्यकांडातील अत्री ऋषींची भेट, पंचवटीतील वास्तव्य, शूर्पणखेचा प्रसंग आणि सीताहरणापर्यंतच्या घटनांचे वर्णन करण्यात आले.

# दहीहंडी सरावाचा नारळ संपन्न; यंदाचा उत्सव स्व. अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित

■ बारामती (दै. संध्या)



सालाबादप्रमाणे ७५ वर्षांची गौरवशाली परंपरा जपत श्री काशीविश्वेश्वर तरुण मंडळ, कसबा-बारामती यांच्या दहीहंडी सरावाचा नारळ प्रथेनुसार नागपंचमीच्या मुहूर्तावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत असतो , मात्र यंदा आदरणीय दादांच्या दुर्दैवी अपघाती निधनामुळे सरावाचा शुभारंभ अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरज सातव, मार्गदर्शक श्री. सदाशिव बापुजी सातव व श्री. दत्तात्रय काकाजी सातव, तसेच मंडळाचे आधारस्तंभ व बारामती नगरीचे नगराध्यक्ष श्री. सचिन सातव यांच्या उपस्थितीत मंडळाच्या वतीने आपले लाडके नेते स्व. अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर परंपरेनुसार भगवान श्रीकृष्णाची विधिवत पूजा करून दहीहंडी सरावाच्या नारळाचा कार्यक्रम पार पडला.

गेल्या अनेक वर्षांपासून मंडळाच्या विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून मंडळाच्या कार्याचे कौतुक तसेच मार्गदर्शन करणारे, अखंड बारामतीकरांचा श्वास असलेले महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार आज आपल्यात नाहीत, ही संपूर्ण बारामतीकरांसाठी अत्यंत दुःखद व मनाला चटका लावणारी बाब आहे.

स्व. अजितदादांचे मंडळाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते, त्यांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन आणि मार्गदर्शन यांची आठवण आजही मंडळाच्या प्रत्येक पदाधिकारी व सदस्याच्या मनात कायम आहे.

या पार्श्वभूमीवर मंडळाचे आजी-माजी पदाधिकारी, सभासद, ज्येष्ठ नेते मंडळी व सहकाऱ्यांच्या विचारविनिमयानंतर, यावर्षी श्री काशीविश्वेश्वर तरुण मंडळातर्फे कोणताही उत्सव अथवा आनंदोत्सवाचा कार्यक्रम आयोजित न करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे.

दहीहंडी उत्सवाची ७५ वर्षांची गौरवशाली परंपरा जपत असतानाच, यावर्षी आनंदोत्सवापेक्षा आपल्या लाडक्या नेत्याच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करणे आणि त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणे याला मंडळाने प्राधान्य दिले आहे.

"दादा, आपण आज आमच्यात नसलात तरी आपल्या आठवणी, आपले मार्गदर्शन आणि बारामतीच्या विकासासाठी केलेले कार्य आमच्या सदैव स्मरणात राहील."

सदैव स्मरणात... आदरणीय दादा...
स्व. अजितदादांच्या पवित्र
स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली!
– अध्यक्ष, सर्व आजी-माजी
पदाधिकारी व सदस्य
श्री काशीविश्वेश्वर तरुण मंडळ,
कसबा – बारामती

# पुणे महानगरपालिका

## निविदा प्रकिया कक्ष

## निविदा जाहिरात - नवीन कामे

विक्री कालावधी दिनांक :-२६/०८/२०२६ ते ०२/०९/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
स्विकृती दिनांक : २६/०८/२०२६ ते ०२/०९/२०२६ दुपारी २:३० पर्यंतत

(दै. पुणे मिरर व संध्या) **जाहिरात क्र. १८ - डी.सी.-१-२०२६-२७**
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक:- ०३/०९/२०२६ दुपारी ३:०० वा.

| अ. क्र. | निविदा.क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/206 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र १४ मिलिंदनगर मध्ये शौचालय दुरुस्ती करणे. | ४१५ | ४२३५३८ | ४२३५ | ८ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/208 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ शिंदे वस्ती मध्ये शौचालय दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७४३७ | ८४७४ | ८ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ३ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/209 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ ब मधील जहांगीरनगर येथे परिसरात ड्रेनेज लाईन करणे, कॉक्रीटीकरण करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७४१७ | ८४७४ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ४ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/210 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ ब मधील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र येथे तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ४२३७०८ | ४२३७ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ५ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/211 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ब मधील मुंढवा परिसरातील शौचालयामध्ये स्थापत्य कामे करणे. | ४१५ | ८४७३६८ | ८४७४ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ६ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/212 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ब मध्ये मुंढवा परिसरामध्ये समाज मंदिरामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७४१३ | ८४७४ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ७ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/213 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ब मधील दरवडे मळा येथे ड्रेनेज लाईन करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७४२५ | ८४७४ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ८ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/214 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ ब मधील घोरपडी परिसरामध्ये समाज मंदिरामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे | ४१५ | ८४७४०१ | ८४७४ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ९ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/215 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ब मधील सर्वोदय कॉलनी, दर्गाह परिसरात ड्रेनेज लाईन करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ८४७३४८ | ८४७३ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १० | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/216 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ब मध्ये कवडे वाडी येथे कॉक्रीटीकरण करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ८४७१९० | ८४७२ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| ११ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/217 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ ब मध्ये धायरकर वस्ती परिसरात ड्रेनेज लाईन करणे. व कॉक्रीटीकरण करणे | ४१५ | ८४७३७७ | ८४७४ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १२ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/218 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ब मध्ये संपूर्ण प्रभागात फुटपाथ दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७३७१ | ८४७४ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १३ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/219 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 मध्ये कोरेगाव पार्क लेन नं -२ रस्ता डांबरीकरण करणे. | ४१५ | ८४७४०० | ८४७४ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १४ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/220 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र १४ मध्ये किरकोळ दुरुस्तीची कामे मजुरांमार्फत करून घेणे. (भाग - २) | ४१५ | ६३५५६९ | ६३५६ | ८ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १५ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/221 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ मध्ये रागविलास सोसायटी येथील रस्ता डांबरीकरण करणे. | ४१५ | ४२३४५१ | ४२३५ | ८ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १६ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/222 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ मध्ये कोरेगाव पार्क लेन नं २ येथील रस्ता रीसर्फेसिंग करणे. | ४१५ | ४२३५४४ | ४२३५ | ८ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १७ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/223 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ मध्ये सयाजीराव गायकवाड चौक मुंढवा येथे डांबरीकरण करणे | ४१५ | ४२३४५१ | ४२३५ | ८ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १८ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/224 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 मध्ये कवडे वाडी अनंतराव गोफणे क्रीडांगण येथे दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | २९६४५२ | २९६५ | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| १९ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/225 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 मध्ये भैरोबा पंपिंग स्मशानभूमी येथे दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ३३८९७१ | ३३९० | ६ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २० | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/226 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ड मध्ये, कोरेगाव पार्क परिसरातील शौचालय दुरुस्ती करणे | ४१५ | ८४७२७१ | ८४७३ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २१ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/227 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ड मध्ये, घोरपडी परिसरातील शौचालय दुरुस्ती करणे. | ४१५ | ८४७३९६ | ८४७४ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २२ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/228 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ड मध्ये गायकवाड वस्ती परिसरात ड्रेनेज लाईन करणे व कॉक्रीटीकरण करणे | ४१५ | ८४७४२५ | ८४७४ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २३ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/229 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ड मध्ये, मुंढवा परिसरातील शौचालय दुरुस्ती करणे. | ४१५ | ८४७३७९ | ८४७४ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २४ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/230 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ ड मध्ये रासगे आळी परिसरात ड्रेनेज लाईन करणे. व कॉक्रीटीकरण करणे. | ४१५ | ८४६९८० | ८४७० | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २५ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/231 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ ड मध्ये शिंदे वस्ती परिसरात ड्रेनेज लाईन व कॉक्रीटीकरण करणे. | ४१५ | ८४७२७५ | ८४७३ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २६ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/232 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ ड मध्ये धायरकर वस्ती परिसरात ड्रेनेज लाईन करणे. व कॉक्रीटीकरण करणे. | ४१५ | ८४७४१७ | ८४७४ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २७ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/233 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र 14 ड मध्ये कवडेवाडी येथे ड्रेनेज लाईन करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७२७७ | ८४७३ | ५ महिने | आकाश कदम ९०२८८८१७०७ |
| २८ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/234 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ अ मध्ये ढवळे वस्ती परिसरात ड्रेनेज लाईन व कॉक्रीटीकरण करणे. | ४१५ | ८४७३४६ | ८४७३ | ७ महिने | रितेश शिंदे ९६८९९१००३८ |
| २९ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/235 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. 14 अ मध्ये संत गाडगे महाराज वसाहत येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ४१५ | ८४७३५३ | ८४७४ | ७ महिने | रितेश शिंदे ९६८९९१००३८ |
| ३० | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/236 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. 14 अ मध्ये सर्वोदय कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ४१५ | ८४७१३६ | ८४७१ | ७ महिने | रितेश शिंदे ९६८९९१००३८ |
| ३१ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/237 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ अ मध्ये मुंढवा परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | ४१५ | ८४७११४ | ८४७१ | ७ महिने | रितेश शिंदे ९६८९९१००३८ |
| ३२ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/238 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. 14 अ मध्ये विकास नगर मस्जिद परिसरात ड्रेनेज व कॉक्रीटीकरण व दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ८४७०६४ | ८४७१ | ७ महिने | रितेश शिंदे ९६८९९१००३८ |
| ३३ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/239 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. 14 अ मध्ये कलाशंकर ते रामनगर या परिसरात ड्रेनेज लाईन व कॉक्रीटीकरण करणे | ४१५ | ८४७२०० | ८४७२ | ७ महिने | रितेश शिंदे ९६८९९१००३८ |
| ३४ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/240 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. १४ अ मध्ये शिंदे वस्ती, वाघ वस्ती परिसरात ड्रेनेज लाईन व कॉक्रीटीकरण करणे. | ४१५ | ८४७४०८ | ८४७४ | ७ महिने | रितेश शिंदे ९६८९९१००३८ |
| ३५ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/241 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभागांमध्ये गणेशोत्सव दरम्यान विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्थाची कामे करणे. | ४१५ | ४२३७०८ | ४२३७ | २ महिने | रोहन मुतुंगे ९६८९९८९१६२ |
| ३६ | PMC/ZONE-1/2026/ DHOLEPATIL/242 | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र १३ ब मध्ये विविध ठिकाणी विद्युत दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ८४७१३२ | ८४७१ | ६ महिने | रोहन मुतुंगे ९६८९९८९१६२ |

अ) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी/म.न.पा. मान्यता प्राप्त/शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.

ब) सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

ड) बयाणा रक्कम ऑनलाईन नेट बँकिंग सुविधेमार्फत स्विकारणेत येणार आहे.

सही/-
(आशा राऊत)
उप आयुक्त
परिमंडळ वि.क्र. १
पुणे महानगरपालिका.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कारवाईला गती देण्याचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांचे निर्देश

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे तसेच अनधिकृत टपऱ्यांवर प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी क्षेत्रनिहाय सर्वेक्षण करून निष्कासनाची मोहीम जलद गतीने राबविण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले. तसेच कारवाईमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भावनातील मधुकर पवळे सभागृह येथे शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस बांधकाम परवानगी विभागाचे सह शहर अभियंता सुनील बागवानी यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच बीट निरीक्षक उपस्थित होते. बैठकीमध्ये सर्व क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत बीट निरीक्षकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक बीट निरीक्षकाने त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्राची नियमित पाहणी करून नव्याने सुरू झालेली तसेच सद्यस्थितीत सुरू असलेली अनधिकृत बांधकामे ओळखून त्यांचे सर्वेक्षण करावे. सर्वेक्षणादरम्यान आढळून आलेल्या अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार तातडीने निष्कासनाची कारवाई करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिल्या. महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांवर झालेली अतिक्रमणे तसेच अनधिकृत व विनापरवाना टपऱ्यांवर प्राधान्याने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच सार्वजनिक पदपथांवर झालेली अतिक्रमणे निष्कासित करून नागरिकांसाठी पदपथ मोकळे व वापरायोग्य ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांच्या प्रकरणांमध्ये केवळ तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याऐवजी संबंधित क्षेत्रातील परिस्थितीची नियमित पाहणी करून स्वतःहून अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे शोधून त्यावर तातडीने कारवाई करावी. याशिवाय, शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात नियमित गस्त व पाहणी करावी. कारवाईसाठी आवश्यक असलेले नियोजन, मनुष्यबळ व यंत्रसामग्री यांचा योग्य समन्वय साधून निष्कासनाची कार्यवाही प्रभावीपणे राबवावी. अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधातील कारवाईमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी स्पष्ट केले. पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर सातत्याने आणि प्रभावीपणे कारवाई करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. बीट निरीक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्राची नियमित पाहणी करून नव्याने होणारी अनधिकृत बांधकामे तातडीने निदर्शनास आणून त्यावर नियमानुसार निष्कासनाची कारवाई करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांवरील अतिक्रमणे, अनधिकृत टपऱ्या तसेच पदपथांवरील अतिक्रमणे प्राधान्याने हटविण्यात येत आहेत. अनधिकृत बांधकामे किंवा अतिक्रमणे होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देण्यात येत आहे. या कामात कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याकडून हलगर्जीपणा झाल्यास त्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

### विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासनासोबत आमदार शेळके यांची महत्त्वपूर्ण बैठक

**मावळ : दैनिक संध्या**

मावळ तालुक्यातील विविध विकासकामे तसेच प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीत पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासमवेत सोमवारी (दि.२४ ऑगस्ट) महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मावळ तालुक्यातील ग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, शिक्षण व घरकुल विभागातील विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या कामांना सुधारित प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार सुनील शेळके यांनी केली. तसेच पाणीपुरवठा योजनांच्या उर्वरित निविदा प्रक्रिया तातडीने राबवून कामांना प्रत्यक्ष गती देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. मावळातील मराठी शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी मॉडेल स्कूलच्या माध्यमातून जास्तीत जास्त शाळांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यावरही चर्चा झाली. सामान्य कुटुंबातील नागरिकांना हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा, यासाठी सुरू असलेल्या घरकुलांच्या कामांचाही आढावा घेण्यात आला. घरकुलांसाठी आवश्यक गायरान जागा उपलब्ध होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचना देण्यात आल्या.

### यमुनानगर येथील NCMC स्मार्ट कार्ड शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी यमुनानगर येथील सदगुरु गार्डनमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) NCMC स्मार्ट कार्ड विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शिबिराचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सुमनताई पवळे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराचे आयोजन नगरसेविका तथा शिवसेना उपनेत्या (महाराष्ट्र राज्य) आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सदस्य सौ. सुलभाताई रामभाऊ उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. यावेळी युवानेते अजिंक्यदादा उबाळे, प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, महिला व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दि.२४ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट २०२६ या दोन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात ज्येष्ठ नागरिक (६५ वर्षांवरील) यांना एस.टी. प्रवासात ५० टक्के सवलत, अमृत ज्येष्ठ नागरिक (७५ वर्षांवरील) यांना मोफत प्रवास, तसेच १२ वर्षांवरील महिलांना ५० टक्के सवलतीचा लाभ मिळण्यासाठी NCMC स्मार्ट कार्ड तयार करून देण्यात येत आहे. फक्त १५० रुपये कार्ड शुल्क भरून हे स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून शिबिराची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ अशी आहे. प्रभागातील सर्व ज्येष्ठ नागरिक व महिलांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संस्कृती आणि परंपरेचे जतन हीच आपली खरी संपत्ती

**■ पिंपरी (दै. संध्या)**

"खानदेशातील माता कानबाई उत्सवाच्या माध्यमातून आपली परंपरा आणि आपला इतिहास आई-वडील आपल्या मुलांना देत असतात. हा वारसा आणि आपला इतिहास पुढील पिढीला देणे अत्यंत आवश्यक असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून तो अतिशय सुंदररीत्या दिला जात आहे." संस्कृती आणि परंपरेचे जतन हीच आपली खरी संपत्ती असल्याचे गौरोद्गार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना उत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसरात वास्तव्यास असलेल्या खान्देशची संस्कृती, परंपरा आणि धार्मिक सणाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत अखंडितपणे पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित तिसऱ्या 'भव्य खान्देश सार्वजनिक कानबाई माता उत्सव २०२६' अत्यंत उत्साहात, चैतन्यमय आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवाची सांगता आज अत्यंत भावपूर्ण वातावरणात माता कानबाईला निरोप देत उत्साहात व भावूक वातावरणात संपन्न झाली. या महोत्सवाच्या प्रास्ताविकात संयोजन समितीचे प्रमुख नामदेव ढाके यांनी उपस्थितांचे स्वागत करून महोत्सवाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. खानदेशातून येऊन शहरी भागात संस्कृती जपणे अभिमानाची बाब – वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे या सोहळ्यात आपले विचार मांडताना वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे म्हणाले की, "खानदेशातून येऊन शहरी भागात आपली संस्कृती जपणे अत्यंत अभिमानाची बाब आहे. माता कानबाई ही खानदेशातील कुलस्वामिनी असून, तिचा जागर करून शहरी भागातील पुढील पिढीपर्यंत तिची महती पोहोचवणे कौतुकास्पद आहे. पुणे-पिंपरी-चिंचवड शहरांच्या विकासात खान्देशी लोकांचा मोठा हातभार असून, एवढ्या दूर राहूनही आपल्या मातीची परंपरा येथील बांधवांनी



कायम राखल्याचा विशेष आनंद आहे."

आमदार शंकर जगताप यांनी कार्यक्रमाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, आपल्या मराठी भाषेला अभिजात मातृभाषेचा दर्जा मिळाला असून अहिराणी भाषेलाही तो मिळाला आहे. त्यामुळे ही मायबोली आपण आपल्या मुलांना शिकवली पाहिजे आणि तिचे जतन केले पाहिजे. महोत्सवादरम्यान पार पडलेल्या सांस्कृतिक आणि संगीतमय कार्यक्रमात खानदेश मातेच्या भक्तिगीत व पारंपरिक अहिराणी गाण्यांनी उपस्थितांसह सर्वांचेच मन जिंकले.

या जल्लोषात आणि उत्साहाच्या वातावरणात बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी देखील उत्स्फूर्तपणे अहिराणी गीतांवर ठेका धरत उपस्थितांचा उत्साह द्विगुणित केला. या क्षणाने कार्यक्रमात एक वेगळीच रंगत आणली होती. महाराष्ट्र राज्याचे बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्यासह आमदार शंकरभाऊ जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, नगरसेवक राहुल कलाटे, विठ्ठल उर्फ नाना काटे, विरोधी पक्षनेता भाऊसाहेब भोईर, धर्मापाल तंतरपाळे, रिटा सानप, सचिन सानप, मा. उपमहापौर सचिन चिंचवडे, रेश्मा कातळे, बापू कातळे, शेखर चिंचवडे, आशाताई सूर्यवंशी, विकास साने, निलेश तरस मानचे सरपंच सचिन आढाव आदी मान्यवर उपस्थित होते. खानदेशवासीयांच्या संस्कृती, परंपरा आणि धार्मिक श्रद्धेचे प्रतीक असलेल्या या तीन दिवसीय महोत्सवाच्या सांगता प्रसंगी माता कानबाईला निरोप देताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि शिरपूरच्या 'गोल्डेन बँड'च्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ८ वाजता शुभम गार्डन ते जाधव घाट, रावेत या मार्गावर कानबाई मातेची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, महिलांचे पारंपरिक फुगडी व गरबा खेळणे आणि "कानबाई माता की जय" च्या जयघोषाने संपूर्ण रावेत परिसर दुमदुमून गेला होता.

## जिल्हा रुग्णालयातून 'सुपर स्पेशालिटी' आरोग्यसेवेचे नवे पर्व

**■ पिंपरी (दै. संध्या)**

जिल्हा रुग्णालयाचा विस्तार करून ते अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालय म्हणून लवकरच रुग्ण सेवेत रुजू होणार असल्याची ग्वाही आमदार शंकर जगताप यांनी दिली. रुग्णालयातील १०० खाटांचा 'क्रिटिकल केअर ब्लॉक' महिन्याभरात कार्यान्वित करण्याचे निर्देश आमदार शंकर जगताप यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या सुविधेमुळे पिंपरी चिंचवड सह जिल्ह्यातील नागरिकांना गंभीर आणि आपत्कालीन आजारांवरील अत्याधुनिक उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

रुग्णालयातील एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स-रे, बर्न वॉर्ड, एसएनसीयू आणि अतिरिक्त आंतररुग्ण सुविधांच्या माध्यमातून आरोग्यसेवेचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. सुपर स्पेशालिटी उपचार सुविधा पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर नागरिकांना उपचारांसाठी खासगी अथवा दूरच्या रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही. सर्वसामान्य रुग्णांना सुलभ, दर्जेदार आणि वेळेत उपचार उपलब्ध करून देणारे प्रमुख आरोग्य केंद्र म्हणून जिल्हा रुग्णालय विकसित केले जाणार आहे. असेही आमदार जगताप यांनी सांगितले. जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधा, अंतर्गत समस्या आणि प्रलंबित विकासकामांचा आमदार जगताप यांनी सोमवारी (ता. २४) संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा घेतला. या वेळी त्यांनी एमआरआय, सीटी स्कॅन आणि एक्स-रे युनिटची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश दिले. यावेळी नगरसेविका तृप्ती कांबळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपायुक्त प्रदीप ठेंगल, सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भाग्यश्री थोपटे, उरो रुग्णालय अधीक्षक डॉ. अभिजीत होसमनी, अग्निशामक अधिकारी व्यंकटेश दुर्वास, उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, कर्मचारी उपस्थित होते.

## प्राधिकरण येथे राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त 'स्वभाव राशींचे' कार्यक्रम उत्साहात संपन्न

**■ पिंपरी (दै. संध्या)**

श्री समर्थ युवा प्रतिष्ठान व प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ज्येष्ठांसाठी आयोजित करण्यात आलेला ज्येष्ठ साहित्यिक व व्याख्याते विश्वास पटवर्धन प्रस्तुत 'स्वभाव राशींचे' हा मनोरंजक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम प्राधिकरण येथील वाढोकर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नगरसेवक तथा निमंत्रक अमित गावडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर जोशी होते. मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रास्ताविकात अमित गावडे यांनी राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनाचे महत्त्व विशद करताना ज्येष्ठांचा अनुभव, प्रेरणा, त्याग आणि




समाजासाठी दिलेले योगदान यांचा सन्मान करण्याचा हा दिवस असल्याचे सांगितले. त्यानंतर वृषाली गुर्जर यांनी प्रमुख वक्ते विश्वास पटवर्धन यांचा परिचय करून दिला. यावेळी त्यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर जोशी यांचाही शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने अध्यक्ष चंद्रशेखर जोशी यांनी अमित गावडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

## मेट्रो स्थानकास "भुजबळ चौक मेट्रो स्टेशन" नामकरण करण्यासाठी निवेदन

**■ वाकड (दै. संध्या)**

पुणे मेट्रो लाईन क्र. ३ अंतर्गत वाकड परिसरात प्रस्तावित असलेल्या मेट्रो स्थानकास "भुजबळ चौक मेट्रो स्टेशन" असे नामकरण करण्यात यावे, या मागणीसंदर्भात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी (भा.प्र.से.) यांच्याकडे अधिकृत निवेदन सादर करण्यात आले.

वाकड परिसरातील भुजबळ चौक हे स्थानिक ओळख आणि सामाजिक संदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे प्रस्तावित मेट्रो स्थानकास "भुजबळ चौक मेट्रो स्टेशन" असे नाव दिल्यास वाकड परिसराची स्थानिक ओळख अधिक अधोरेखित होण्यास मदत होईल. या मागणीचा प्रशासनाने सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

तसेच वाकड परिसरातील प्रस्तावित डी.पी. रस्ते व शिवरस्त्यांच्या विकासकामांना गती देणे, वाहतूक व्यवस्था सक्षम करणे आणि नागरिकांच्या दळणवळणाच्या



सुविधा अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, याबाबतही प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. वाकड परिसरातील पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्थानिक विकास आणि नागरिकांच्या सार्वजनिक सुविधांशी संबंधित प्रश्नांच्या निराकरणासाठी प्रशासनाच्या समन्वयाने सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. यावेळी पिंपरी-चिंचवड उपाध्यक्ष श्री. राम वाकडकर, नगरसेविका सौ. श्रुती वाकडकर, नगरसेविका सौ. रेश्मा भुजबळ, नगरसेवक श्री. कुणाल वाव्हळकर आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रमोद चौधरी उपस्थित होते.


## आशीर्वाद देण्याच्या बहाण्याने साधूबाबाने केली सोन्याची अंगठी लंपास

**■ पिंपरी (दै. संध्या)**

थेरगाव येथील एका व्यक्तीला आशीर्वाद देण्याच्या बहाण्याने फसवून सोन्याची अंगठी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात अज्ञात साधूविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजित रामचंद्र पाटील (वय ४९, रा. अक्षय चंदन सोसायटी, ब थेरगाव) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ही घटना २२ ऑगस्ट रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास महापालिका आयुक्तांच्या बंगल्यासमोरील रस्ता ते एचडीएफसी बँक, पूर्णानगर, चिंचवड या दरम्यान घडली.

फिर्यादी हे कारने जात असताना एका अनोळखी साधूने त्यांना लिफ्ट मागितली. कारमध्ये बसल्यानंतर त्याने स्वतःला नागा साधू असल्याचे सांगून आपल्या आशीर्वादामुळे सुख-समृद्धी मिळेल, असे सांगितले. त्यानंतर त्याने फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्या हातातील सोन्याची अंगठी काढून घेण्यास सांगितले. सदर अंगठी डोळ्यांना लावून पुन्हा कारच्या गिअर शिफ्टजवळ ठेवण्याचे नाटक करत साधूने ती स्वतःजवळ ठेवली आणि तेथून पसार झाला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. आरोपी साधूचे वय अंदाजे ५० वर्षे असून उंची सुमारे साडेपाच फूट आहे. त्याचा रंग सावळा असून अंगात भगवे वस्त्र, डोक्यावर फेटा आणि हातात मोठे कडे असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तो हिंदी भाषेत बोलत होता. याप्रकरणी चिखली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हवालदार व्होनमाने करीत आहेत.



# सोमेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ म्हणजे संस्कृती व ज्ञानाचा अनमोल ठेवा

**■ पिंपरी (दै. संध्या)**

आदर्श नगर, रावेत येथील सोमेश्वर जेष्ठ नागरिक संघाचा तृतीय वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सभासदांचा सुमधुर आवाजातील 'स्वरयात्रा' हा मराठी-हिंदी गीतांचा दर्जेदार कार्यक्रम सादर झाला बाळासाहेब क्षीरसागर लिखित व दिग्दर्शित विनोबा भावे यांच्या 'भूदान' चळवळीवर आधारित लघुनाटिकेच्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली.

संघाचे सचिव सुरेश बडगुजर यांनी संघाच्या वर्षभरातील विविध उपक्रम व कार्यक्रमांची माहिती प्रेक्षकांना दिली ;तर आगामी काळात वाचन कट्टा, परिसरातील गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कार, गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप ,समाज प्रबोधनासाठी व्याख्यानमाला इत्यादी उपक्रम आयोजित करण्याचा मानस संघाचा आहे असे त्यांनी सांगितले. व्यासपीठावर उपस्थित मा. आमदार अश्विनी जगताप यांनी सांगितले की मी तुम्हा जेष्ठांमध्ये माझे सासू-सासरे, आई-वडील बघत असते. त्यांनी संघाच्या वाटचालीचे कौतुक केले. कै. आमदार लक्ष्मण जगताप यांच्या आठवणींनी त्यांना गहिवरून आले. मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड म्हणाले की हा ज्येष्ठ नागरिक संघ नसून श्रेष्ठ नागरिक संघ आहे .भारतीय संस्कृती रुजविण्याचे खरे काम संघ करत असल्याचे त्यांनी सांगितले .ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषालीताई मरळ म्हणाल्या की पालिकेकडून आपल्या सर्व संघांना देण्यासाठी समई आल्याआहेत, त्या




लवकरच दिल्या जातील. तसेच सर्व संघांना सर्वतोपरी आवश्यक मदत केली जाईल.

यावेळी मा.आ.अश्विनी जगताप, नगरसेवक निलेश तरस, धरमपाल तंतरपाळे, नगरसेविका ऐश्वर्या तरस, मा. नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्याक्षा वृषाली मरळ, युवा सेना मावळ अध्यक्ष राजेंद्र तरस, संकल्प सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बापूसाहेब कातळे, माधवबागचे डॉ.तुषार पाटील, मानवी हक्क संरक्षण आणि जागृती चे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, संघाचे अध्यक्ष सुदाम दिवटे, उपाध्यक्ष साहेबराव पाटील ,सचिव सुरेश बडगुजर, खजिनदार प्रकाश सावंत,मानवी मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्ष संगीता जोगदंड तुकाराम कोरडे, किशोर गायकवाड, धोंडीराम पाटील ,राजेंद्र मोरे, रंजना सस्ते, सांस्कृतिक विभाग प्रमुख रोहिदास पिलाने उपस्थित होते. संघाचे सभासद, महासंघाचे प्रतिनिधी व परिसरातील ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक संघाचे अध्यक्ष सुदाम दिवटे यांनी केले सूत्रसंचालन सुरेश बडगुजर आणि आभार प्रकाश सावंत यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कोडीत गावच्या श्रीनाथ जोगेश्वरी सांस्कृतिक महिला ग्रुपने पटकावला प्रथम क्रमांक

**पुरंदर : दैनिक संध्या**

श्रावणातील पारंपरिक सण-उत्सवांना आधुनिक सांस्कृतिक महत्त्व पटवून देण्यासाठी गराडे (ता. पुरंदर) येथे डॉ. ममताताई शिवतारे फाऊंडेशन प्रस्तुत पुरंदर महिला आघाडी शिवसेनेच्या वतीने 'श्रावणसखी महोत्सव' उत्साहात पार पडला. मंगळागौर स्पर्धेत विविध पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांनी गाणी, नृत्य व सांस्कृतिक सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. दिवे - गराडे गणातील महिलांसाठी आयोजित या महोत्सवात या महोत्सवात उत्कृष्ट वेशभूषा, उत्कृष्ट जोडी, उत्कृष्ट ग्रुप, उत्कृष्ट लिटल चॅम्प, ग्रुप गायन तसेच नृत्य अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विविध रंगीबेरंगी वेशभूषा परिधान करून महिलांनी एकापेक्षा एक सरस गाणी व नृत्य सादर केले तसेच पारंपरिक मंगळागौरीच्या खेळांनी कार्यक्रमात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. प्रत्येक सादरीकरणातून महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले. डॉ.ममता शिवतारे यांच्या हस्ते या महोत्सवाचे उदघाटन करण्यात आले. स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे : प्रथम क्रमांक श्री नाथ जोगेश्वरी सांस्कृतिक महिला ग्रुप कोडीत, द्वितीय क्रमांक गराडे मठवाडी महिला, तृतीय क्रमांक कोडीत, चतुर्थ क्रमांक : प्रणिता बडदे शिवगर्जना व सहभागी ग्रुपला सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. ममता शिवतारे, उपजिल्हाप्रमुख शिवसेना वैशाली काळे, माजी जि. प. सदस्या व पुरंदर तालुका प्रमुख ज्योतीताई झेंडे, तालुका संघटक प्रियंका सुकल, उपतालुका प्रमुख अलका बडदे, दिपाली भोराडे, सुप्रिया रावडे, प्रियंका कटके, प्रतिभा कदम यांच्यासह परिसरातील गावातील महिलांची मोठी उपस्थिती होती. श्रावणसखी महोत्सवाच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव देणारे हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच आपल्या समृद्ध मराठमोळ्या परंपरा आणि संस्कृतीचे जतन व्हावे हा या उपक्रमामागील उद्देश आहे. महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध कला सादर केल्या असे उपजिल्हाप्रमुख शिवसेना वैशाली काळे यांनी सांगितले. महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाईल, असे विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके वितरण करताना डॉ.ममता शिवतारे यांनी यावेळी सांगितले. मागील वर्षीही श्रावणातील पारंपरिक मंगळागौर खेळ, कला व सांस्कृतिक सादरीकरणातून महिलांनी जुन्या परंपरांना उजाळा दिला आहे.



### 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानास सासवडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुरंदर : दैनिक संध्या**

मेरा युवा भारत (MY Bharat), युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आभासी संवाद कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि. २ ऑगस्ट) सकाळी ११.०० वाजता गुरुकुल अकॅडमी, सासवड, पुणे येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थी, युवक-युवती, शिक्षक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यसनमुक्त भारत घडविण्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन आभासी माध्यमातून ऐकले. पंतप्रधानांनी युवकांनी व्यसनापासून दूर राहून निरोगी, सशक्त आणि विकसित भारताच्या निर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन केले. यावेळी केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्री डॉ. मानसुख मांडविया यांच्या प्रेरणादायी संदेशाचेही प्रसारण करण्यात आले. त्यांनी युवकांना समाजात व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याचे आणि प्रत्येक गाव, शहर व शैक्षणिक संस्थेत व्यसनमुक्त भारताचा संदेश पोहोचविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात उपस्थित सर्व विद्यार्थी, युवक आणि मान्यवरांनी 'नशा मुक्त भारत' प्रतिज्ञा घेऊन व्यसनमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अँड .अक्षयदादा मारणे, अध्यक्ष, सासवड शहर मराठा महासंघ, श्री श्रीकांत बबन जगताप, अध्यक्ष, सरस्वती ज्ञान संस्था, सासवड, तसेच श्री स्वप्नील शिंदे, मेरा युवा भारत पुणे व श्री.शिवाजी नॉलेज सिटी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पंकज साबळे यांनी सूत्रसंचालन केले तसेच उपस्थित मान्यवरांनी युवकांना व्यसनापासून दूर राहून शिक्षण, क्रीडा, सामाजिक कार्य आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले. याउपक्रमासाठीआयोजन श्री.शिवाजी नॉलेज सिटी संस्थेने केले. आणि आभार अनिता शिंदे, समन्वयक, गुरुकुल अकॅडमी, सासवड यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी, शिक्षकांनी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे आयोजन मेरा युवा भारत (MY Bharat), पुणे यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करण्यासह विकसित भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

### निरक्षर विद्यार्थी व नागरिकांना शिक्षणाची संधी : कृष्णकुमार पाटील

**पुरंदर : दैनिक संध्या**

श्री भुलेश्वर मंदिर परिसरात NILP नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत साक्षरता जनजागृती अभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी श्री. कृष्णकुमार पाटील. संचालक, शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य, श्री. शशिकांत म्हेत्रे. सहसंचालक, शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य, श्री. सतीश चौधरी. सहाय्यक संचालक, शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य, श्री. रोहित यादव, प्रोग्राम कॉर्डिनेटर शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य उपस्थित होते. या प्रसंगी श्री भुलेश्वर विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळशिरस, सन ब्राईट इंग्रजी मिडीयम शाळा या शाळांच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढून, पथनाट्य आणि साक्षरता गीते सादर केली. या प्रसंगी श्री. कृष्णकुमार पाटील यांनी सर्वांना साक्षरतेची शपथ दिली आणि योजना विभागाद्वारे चालवल्या जाणाऱ्या राजीव गांधी विद्यार्थी अपघात विमा, NMMS, इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षा, इतर शिष्यवृत्ती अशा विद्यार्थी लाभाच्या योजनांची तसेच नवभारत साक्षरता कार्यक्रमाची संपूर्ण माहिती दिली.

# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची जयंती साजरी

■ जेजुरी (दै. संध्या)

स्वराज्याच्या विस्तारासाठी अद्वितीय शौर्य, धाडस, नेतृत्व आणि युद्धकौशल्याचा परिचय देणारे अपराजित योद्धा श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची जयंती जेजुरी येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यालयाच्या परिसरात ऐतिहासिक वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी इतिहासाचे अभ्यासक जगन्नाथ लडकत यांनी विद्यार्थ्यांना श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जीवनकार्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी बाजीराव पेशवे यांच्या पराक्रमाची, युद्धनीतीची, नेतृत्वगुणांची आणि स्वराज्य विस्ताराच्या ध्येयाची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. प्रतिकूल परिस्थितीतही आत्मविश्वास, धैर्य आणि दूरदृष्टीच्या जोरावर मोठी उद्दिष्टे साध्य करता येतात, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणून बाजीराव पेशवे यांच्या जीवनाकडे पाहता येते, असे त्यांनी सांगितले. 'राऊस्वामी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या शौर्यगाथेचा इतिहास विद्यार्थ्यांनी केवळ वाचू नये, तर त्यातून धैर्य, शिस्त, नेतृत्व, राष्ट्रनिष्ठा आणि कर्तव्यभावना यांसारखी मूल्ये आत्मसात करावीत, असा संदेशही यावेळी देण्यात आला. इतिहासातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपल्या इतिहासाविषयी अभिमान आणि जाणिवेची भावना निर्माण होते, असेही यावेळी नमूद करण्यात आले.





## श्री कडेपठार जेजुरी येथे 'कडेपठार घनवन प्रकल्पासाठी' वृक्षारोपण

■ चाकण (दै. संध्या)

जेजुरी:वार्ताहर दिनांक 25 महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या श्री कडेपठार (मुळस्थान) ते जेजुरी खंडोबा मंदिर या सुमारे ३ किलोमीटरच्या पायी मार्गावर तसेच कडेपठार पायरी मार्गावर देवरायांचा'घनवन' साकारण्याचा संकल्प श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्टने केला आहे. AISSMS कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे मधील " "राष्ट्रीय सेवा योजनेच्या १२० विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवून डोंगरात वृक्षारोपण केले.

या पर्यावरणपूरक मोहिमेची सुरुवात "गणपूजा २०२६" या शुभ मुहूर्तावर झाली होती . या मोहिमेत AISSMS कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे मधील " "राष्ट्रीय सेवा योजनेच्या"' (NSS) मधील सुमारे १२० विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक यांनी श्रमदान करून वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि स्वच्छता मोहीम राबिण्यात आली.

या मोहिमेने अॅड मंगेश जेजुरीकर यांनी देवस्थानच्या घनवन संकल्पने बद्दल माहिती दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भाविक नागरिकांनी या पर्यावरण रक्षणाच्या महायज्ञात सक्रिय सहभागी व्हावे; जेणेकरून तीर्थक्षेत्र कडेपठार डोंगररांगा आणि मुळस्थान कडेपठार ते जेजुरी गड मुख्य पायी मार्ग पूर्णपणे हिरवाईने नटवून टाकता येईल." भविष्यात या मार्गावर दुर्तफा घनवन फुलविण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

या मोहिमेत प्रा. डॉ. शेजवळ लायन्स क्लब पूना सिटी दिलीप थोरात, कौशल पांगारे, आदित्य खोमणे, बबनराव मुळगीकर, साहिल गायकवाड,ओम घोडके, देवस्थानचे विश्वस्त मयूर दिडभाई व विद्यार्थी सहभागी झाले होते. कडेपठार गडावर राबविण्यात आलेल्या अभियानाबाबत सर्व सहभागी सभासदांचे श्री कडेपठार ट्रस्टच्या वतीने आभार मानण्यात आले.

## ६९ वर्षीय राम यादव अडसुळ यांनी रचला इतिहास

■ देहूरोड (दै. संध्या)

वय हे केवळ एक आकडा असल्याचे सिद्ध करत ६९ वर्षीय श्री राम यादव अडसुळ यांनी उल्लेखनीय कामगिरी करत इतिहास रचला आहे. देहूरोड येथे आयोजित विशेष विक्रम प्रयत्नादरम्यान त्यांनी सुमारे ३ फूट उंच टेबलवर ८.२२ सेकंद शीर्षासन (Headstand) करून अनोखा विश्वविक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची नोंद इंटरनॅशनल एक्सलन्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स (IEA Book of World Records) मध्ये करण्यात आली आहे.

हा विक्रम प्रयत्न IEA Book of World Records च्या ज्युरी पॅनलच्या देखरेखीखाली पार पडला. निर्धारित आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे व पडताळणी प्रक्रियेचे पालन करून ज्युरी सदस्यांनी या विक्रमाची अधिकृत नोंद व सत्यापन केले. यावेळी डॉ. संदीप सिंह (मुख्य कार्यकारी अधिकारी – IEA Book of World Records) तसेच योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरीजी महाराज (राष्ट्रीय ज्युरी, महाराष्ट्र) हे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी श्री अडसुळ यांच्या जिद्द, चिकाटी आणि समर्पणाचे कौतुक करत ही कामगिरी समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार म्हणून अमर राम अडसुळ, लहू राम अडसुळ, डॉ. राजेंद्र ताकले, दीपक मित्तल, सुशीलकुमार गोयल, आकाश गायकवाड आणि मानव लोहेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास माध्यम प्रतिनिधी म्हणून सागर खोट, शुभम खोट, नवशाद अन्सारी आणि नेहा सोनवणे यांनी उपस्थिती लावली. विक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर श्री राम यादव अडसुळ यांना ट्रॉफी, मेडल, बॅज, प्रमाणपत्र आणि रेकॉर्ड किट प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्री अडसुळ यांच्या कार्याचे कौतुक करत, "जिद्द, आत्मविश्वास आणि सातत्य असेल तर कोणत्याही वयात नवा इतिहास घडवता येतो," असे मत व्यक्त केले.

इंटरनॅशनल एक्सलन्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स (IEA) ही संस्था जागतिक स्तरावरील असामान्य कामगिरी, विशेष कौशल्ये आणि विक्रमांची नोंद, पडताळणी व सन्मान करणारे आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे. श्री राम यादव अडसुळ यांच्या या अभिमानास्पद यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पठारवाडी येथे विद्यार्थ्यांना दप्तर व खाऊ वाटप

■ पुरंदर (दै. संध्या)

श्री मार्तंड देवस्थान जेजुरी यांच्या सौजन्याने विश्वस्त पोपट खोमणे अध्यक्ष जेजुरी देवस्थान, जेजुरी शहरातील उद्योजक प्रशांत शहा , कोळविहिरे माजी सरपंच शांताराम घाटे माजी सरपंच , शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष सोमनाथ पिसे, अंगणवाडी मदतनीस सुषमा घाटे यांच्या हस्ते चांबळी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पठारवाडी येथील विद्यार्थ्यांना दप्तर व खाऊ वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक सुनील गाडे यांनी केले. तर सूत्रसंचालन रोहिदास तांदळे यांनी मानले.

पठारवाडी शाळेतील मुलांना खाऊ वाटप केल्याबद्दल पठारवाडी शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने मार्तंड देव संस्थान जेजुरी यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## वीजबिलाच्या तक्रारीसाठी नीरा ग्रामस्थांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

■ नीरा(दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील नीरा-शिवतक्रार परिसरातील ग्रामस्थांनी महावितरणच्या कथित गलथान कारभाराविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. गेल्या दोन ते चार महिन्यांपासून अनेक ग्राहकांचे मीटर रीडिंग न घेताच वीजबिले आकारण्यात आल्याने आता ग्राहकांना मोठ्या रकमेच्या वाढीव बिलांचा सामना करावा लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या समस्यांसह स्मार्ट मीटर बसविण्याच्या मुद्द्यावरून ग्रामस्थांनी महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढून अधिकाऱ्यांना निवेदन दिले.



नीरा-शिवतक्रार ग्रामपंचायतीने परिसरात स्मार्ट मीटर बसवू नयेत, असे लेखी पत्र तसेच ठरावाद्वारे कळविले असतानाही ग्राहकांच्या घरांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. ग्रामपंचायतीच्या पत्राची व ठरावाची दखल न घेता स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. विनापरवानगी बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर तातडीने काढून पूर्वीचे मीटर पुन्हा बसवावेत, अशी प्रमुख मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, प्रत्यक्ष वीज वापराच्या युनिटच्या रकमेव्यतिरिक्त वीज बिलामध्ये आकारण्यात येणारे विविध कर, शुल्क व इतर आकार अवाजवी असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला. प्रत्येक ग्राहकाला बिलातील सर्व आकारणीचा सविस्तर तपशील देण्यात यावा आणि कोणत्या कारणासाठी किती रक्कम आकारली जाते, याची स्पष्ट माहिती ग्राहकांना मिळावी, अशी मागणी करण्यात आली. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वाढलेल्या बिलांची तातडीने तपासणी करून दुरुस्ती करावी, तसेच बिलांची दुरुस्ती होईपर्यंत कोणत्याही ग्राहकाचे वीज कनेक्शन तोडू नये, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. ग्रामस्थांनी महावितरणला ५ सप्टेंबरपर्यंत मागण्या पूर्ण करण्याची मुदत दिली आहे. या कालावधीत मागण्या मान्य न झाल्यास मंगळवार, ८ सप्टेंबरपासून नीरा-शिवतक्रार कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले. यावेळी महेश जेधे, टी. के. जगताप, मंगेश ढमाळ, सुधीर शहा, संतोष मोहिते, चंद्रशेखर पवार, पी. एल. निगडे, अरविंद जेधे, शुभम ढावरे यांच्यासह नीरा-शिवतक्रार परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विज बिल जर चुकीचे असेल तर ग्राहकांना दुरुस्त करून दिले जाईल. त्याचबरोबर ग्रामस्थांनी ज्या मागण्या केल्या आहेत, त्या मागण्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवल्या जातील.

# भामा इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांची निवड

■ चाकण (दै. संध्या)

बाल रंगभूमी परिषद पुणे व उपशाखा पिंपरी चिंचवड आयोजित स्व.मनिषाताई भोईर स्मृती नाट्यछटा स्पर्धेची प्राथमिक फेरी भामा इंग्लिश मिडीयम स्कुल या केंद्रावर पार पडली.

कार्यक्रमाचे दीपपूजन नगराध्यक्षा मनिषाताई गोरे, मनोहरबापू शेवकरी यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत १ ली ते ९ वी एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये प्राथमिक फेरी मधून पाच विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय अंतिम फेरीसाठी निवड झाली.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी - गट इ. १ ली ते ४ थी तन्वी नितीन गोरे, स्वरा धीरज बडोले. गट इ.५ वी ते ७ वी श्रावणी इंद्रजीत पासबोले, दीपिका दिनेश यादव. गट इ.८ वी ते ९ वी प्राजक्ता प्रवीण जाधव. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मनिषा थिटे व कुसुम करपे यांनी अतिशय मोलाचे कार्य करून पारदर्शक निकाल जाहीर केला. कार्यक्रमाचे बक्षीस वितरण नगराध्यक्षा मनिषाताई गोरे व संस्थेचे अध्यक्ष विकासभाऊ गोरे, उद्योजक मनोहरबापू शेवकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी मनिषाताई गोरे, प्रमिला गोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पालकांचे स्वागत केले. प्रमुख उपस्थितीमध्ये भामा स्कूलच्या प्रिन्सिपल माधुरी गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, ज्योती आनाप, प्रेरणा काळे होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिक्षक वंदना बकाल यांनी केले.संस्थेचे अध्यक्ष व प्रिंसिपल यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

माधुरी गोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा काळे यांनी केले. पसायदान गाऊन कार्यकामाची सांगता झाली.






दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### दुर्घटनेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय समिती गठीत

अमरावती : जिल्हा स्त्री रुग्णालयातील अतिदक्षता विभागात आग लागून 3 नवजात बालके मृत्युमुखी पडल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. येत्या आठ दिवसात ही समिती अहवाल सादर करणार आहे. यात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, कोणाचीही गय केली जाणार नाही, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी येथे दिली. जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी दुर्घटना घडलेल्या एनआयसीयूला भेट देऊन पाहणी केली. यावेळी आमदार सुलभा खोडके, महापौर श्री. चंद तेजवानी, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, विभागीय आयुक्त नयना गुंडे, आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, जिल्हाधिकारी आशिष येरेकर उपस्थित होते. आरोग्यमंत्री श्री. आबिटकर म्हणाले, आज प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केली आहे. यातून घटनेची भीषणता दिसून आली. ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. दोन वर्षांपूर्वीच हे नवीन रुग्णालय सुरू करण्यात आले. तेथे संपूर्ण अद्ययावत सोयीसुविधा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारची घटना घडायलाच नको होती. या घटनेचे नेमके कारण शोधून यापुढे अशी घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत महाराष्ट्र विद्युत महामंडळाचे मुख्य अभियंते, एम्सचे वरिष्ठ अधिकारी, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असणार आहे. येत्या आठ दिवसात घटनेचा सखोल तपास करून प्रत्यक्ष जबाबदार असलेल्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.

### बुरुड समाजाच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक

मुंबई : बुरुड समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांवर शासन सकारात्मक असून कार्यवाही करण्याच्या सूचना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. बुरुड समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाच्या अनुषंगाने विविध मागण्यांबाबत मंत्री शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उपसचिव अशोक आत्राम, सामाजिक न्याय विभागाचे उपसचिव रविंद्र गोरवे, सतीश खैरमोडे, ग्रामविकास विभागाच्या अवर सचिव संगीता लांडे, तसेच अमोल वडतीले महसूल व नगर विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी समाजाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. यावेळी बुरुड समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन मंत्री श्री. शिरसाट यांना सादर करण्यात आले. समाजाला जात प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ करणे, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ५० कोटी रुपयांचे विकास पॅकेज उपलब्ध करून देणे, तसेच नगरपरिषद व ग्रामपंचायतींच्या बाजारपेठांमध्ये व्यवसायासाठी स्टॉल उपलब्ध करून देणे, या प्रमुख मागण्यांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

### योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा

मुंबई : मत्स्यव्यवसाय विभागाचा निधी प्रभावीपणे खर्च होण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावे. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेवर विशेष भर देऊन लाभार्थ्यांची संख्या वाढवावी, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. मत्स्यव्यवसाय विभागाच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विविध योजना महा-डीबीटीच्या माध्यमातून ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देऊन नागरिकांना त्यांचा लाभ अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा, याबाबत मंत्रालयात मंत्री राणे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक झाली. बैठकीस मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांच्यासह विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री राणे म्हणाले, भूजलाशयीन, निमखारे पाणी आणि सागरी मत्स्यव्यवसायासाठीच्या ६ राज्यस्तरीय, १९ जिल्हास्तरीय आणि ३ योजनांमध्ये सुधारणा अशा एकूण २८ योजनांना मान्यता देण्यात आली आहे. यापैकी ४ राज्यस्तरीय, १८ जिल्हास्तरीय आणि २ योजनांमध्ये सुधारणा अशा एकूण २४ योजनांसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटी वितरीत



■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई, दि. २४ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीअंतर्गत आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण ₹१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून, लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत आहे.आतापर्यंत १३.७० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभ वितरण ऑनलाइन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

## कारागृहातील बंद्यांच्या मनपरिवर्तनासाठी मुलाखत कक्ष उपयुक्त : पाटील

■ सांगली (दै. संध्या)

कारागृहातील बंद्यांचे माणूस म्हणून पुनर्वसन होणे आवश्यक आहे. त्यांच्या मनपरिवर्तनासाठी नातेवाईकांशी संवाद महत्त्वाचा असून, मुलाखत कक्षाच्या माध्यमातून त्यासाठी चांगली सुविधा निर्माण झाली आहे. कारागृहात असे सुधारणात्मक कार्यक्रम राबवण्यासाठी तसेच मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी शासकीय निधी तसेच सामाजिक उत्तरदायित्त्व निधीतून तरतूद करू, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे केले.

सांगली जिल्हा कारागृहातील बंद्यांसाठी बांधलेल्या नवीन मुलाखत कक्षाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. सांगली जिल्हा कारागृह येथे आयोजित या कार्यक्रमास आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रमोद भोकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमर नलवडे, पालमंत्री महोदयांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, कारागृह अधीक्षक विजय कांबळे, कौशल्य विकास विभागाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त हणमंत नलवडे, नगरसेविका स्वाती शिंदे, वरिष्ठ तुरूंगाधिकारी अरूण मदने, तुरूंगाधिकारी माधुरी मोरे आदि उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, माणसाच्या हातून अनावधानाने झालेल्या अपराधासाठी त्याला त्याच्या स्वजन व नातेवाईकांपासून दूर राहणे हीच मोठी शिक्षा असते. पश्चात्तापदग्ध कैद्यांना माणूस म्हणून जगण्यासाठी तसेच त्यांच्या मनपरिवर्तनासाठी अनेक उपक्रम कारागृह प्रशासनाकडून राबवले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून बंद्यांना त्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी मुलाखत कक्ष करण्यात आला आहे. नातेवाईकांशी संवाद साधून बंद्यांचे मनपरिवर्तन होऊ शकते. त्यांना चांगले जीवन जगण्याची उमेद मिळू शकते, असे ते म्हणाले.



पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, मनपरिवर्तन होऊन चांगल्या वर्तणुकीमुळे किंवा अन्य कारणाने शिक्षेत सूट मिळालेल्या बंद्यांचे पुनर्वसन होऊन त्यांना माणूस म्हणून चांगले जीवन व्यतीत करता यावे म्हणून शासन अनेक सकारात्मक उपक्रम राबवत आहे. त्या दृष्टीने कौशल्य विकासाचे धडे त्यांना देण्यात आले असून, कारागृहातील मूलभूत सोयी सुविधांसाठी आवश्यक निधी सदैव उपलब्ध करून देऊ, असे ते म्हणाले.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगली जिल्हा कारागृहात बंद्यांना न्यायालयीन कामकाजासाठी अधिक सुलभ सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी तयार करण्यात आलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग क्युबिकल कक्षाला भेट देऊन पाहणी केली. सांगली जिल्हा कारागृह येथे जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून बंद्यांना त्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी मुलाखत कक्ष बांधण्यात आला आहे. यामध्ये एका वेळी 10 कैद्यांना त्यांच्या नातेवाईकांना भेटता येणार आहे. यासाठी 62 लाख रूपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

न्यायाधीन बंद्यांना आठवड्यातून एक दिवस व शिक्षाधीन बंद्यांना पंधरा दिवसातून एक वेळेस नातेवाईकांसोबत भेट देण्यात येते. या मुलाखत कक्षामुळे बंद्यांना त्यांच्या नातेवाईकांसोबत भेटण्यास सुसज्ज मुलाखत कक्ष जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून बांधण्यात आले आहेत. बंद्यांना व बंद्यांच्या नातेवाईकांना व त्यांच्या वकिलांना प्रत्यक्ष भेटीवेळी या मुलाखत कक्षातून संवाद साधता येणार आहे. बंद्यांची नातेवाईकांबरोबर समक्ष भेट झाल्याने त्यांचा ताणतणाव कमी होऊन, गुन्हेगारीपासून दूर जाण्यासाठी त्यांची मानसिकता तयार होण्यासाठी मदत होते. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, सांगली यांच्यावतीने कारागृहातील एकूण 81 बंद्यांना संगणक डाटा एन्ट्री ऑपरेटरचे प्रशिक्षण दिले गेले. ते सर्व या डाटा एन्ट्री परीक्षेत उत्तीर्ण झाले. यापैकी 66 बंदी जामीनवर मुक्त झाले आहेत. सध्या कारागृहात 15 बंदी बंदिस्त असून त्यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. बंदी कारागृहातून मुक्त झाल्यानंतर सदर सर्टीफिकेटचा व कोर्सचा त्यांना नवीन आयुष्य जगण्याकरिता उपयोग होईल व देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून जगण्यास प्रोत्साहन मिळेल.

## जिल्हा वार्षिक योजनांतर्गत ८२१ कोटींचे नियोजन

■ यवतमाळ (दै. संध्या)

जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन 2026-27 साठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजना अशा तीन योजनांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत एकूण रु.821 कोटींचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत 492.60 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. दरम्यान, सन 2025-26 मध्ये प्राप्त झालेला निधी निर्धारित उद्दिष्टानुसार 100 टक्के खर्च करण्यात आला असल्याची माहिती पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. यावेळी जिल्ह्यातील विविध विकासकामे, योजनांची अंमलबजावणी, निधी खर्च आणि प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार धीरज लिंगाडे, आमदार दुष्यंत चतुर्वेदी, आमदार किसन वानखेडे, आमदार राजू तोडसाम, आमदार संजय देरकर, आमदार बाळासाहेब मांगुळकर, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात, समाज कल्याण सहायक आयुक्त मंगला मुन, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील निर्देशांच्या अनुपालनाचा यावेळी आढावा घेण्यात आला. तसेच सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजनेंतर्गत मार्चअखेर झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. पालकमंत्री संजय राठोड यांनी प्रगतिपथावरील कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. "कामे दर्जेदार झाली पाहिजेत. प्रलंबित कामे मुदतीत पूर्ण झाली नाहीत तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

डीपीसीच्या कामांचा यापुढे दर दोन महिन्यांनी आढावा घेण्यात येणार असून मुदत संपूनही कामे पूर्ण न झाल्यास संबंधित विभागाच्या सचिवांना याबाबत कळविण्यात येईल. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तकात नोंद करून वेतनवाढ थांबविण्याची शिफारस करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने विकासकामांकडे गांभीर्याने पाहून कामांना गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्ह्यातील रस्त्यांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीचे दक्षता पथक स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. स्मशानभूमीसाठी आवश्यक जागा एका महिन्यात उपलब्ध करून देण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले. जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देताना लोकप्रतिनिधींच्या सूचना व हरकतींचा विचार करावा, असेही त्यांनी प्रशासनाला सांगितले. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा रक्कम मिळण्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या विषयावर सकारात्मक आहेत.

याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्याचा निर्णय झाल्याची माहिती पालकमंत्र्यांनी दिली. दारव्हा तालुक्यातील दहेली येथील दुर्घटनेतील जबाबदार विभाग आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही पालकमंत्री संजय राठोड यांनी दिले. तसेच कृषी सोलर पंपासंदर्भातील तक्रारींची जिल्हाधिकारी यांनी सविस्तर आढावा घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

या बैठकीत स्मार्ट मीटर, रस्त्यांवरील मटण दुकाने, शववाहिनी, महात्मा फुले नाट्यगृह, शिवशृष्टी, शहरातील सिग्नल, जलजीवन मिशन आदी विषयांवर चर्चा करून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी बाभूळगाव तालुक्यातील कोटंबा आणि राळेगाव तालुक्यातील जळका येथे ३३ केव्हीचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्याचे निर्देश दिले.

## महा वॉकेथॉन' आणि जलसंवर्धनाचा संकल्प

मराठवाड्याच्या हृदयस्थानी असलेला लातूर जिल्हा. जिल्ह्यासाठी 'पाणी' हा विषय महत्त्वाचा. गेल्या काही दशकांत आपण भूजल पातळीतील घट अनुभवली. जमिनीखालील जलस्तराचा अभ्यास केल्यास प्रत्येक थेंब जमिनीत मुरवणे ही काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने २१ ऑगस्ट हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून घोषित केला आहे, जो लातूरच्या जलचळवळीला नवी दिशा देणारा ठरणारा आहे, यावर आधारित हा विशेष लेख.

माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र देऊन राज्यात जलसंधारणाची मोठी चळवळ उभी केली. त्यांच्या गौरवार्थ २१ ऑगस्ट हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा होत आहे. लातूर जिल्ह्यात या दिवशी आयोजित होणारी 'महा वॉकेथॉन- वॉक फॉर वॉटर' ही केवळ एक रॅली नाही, ती आपल्या पाण्यासाठी केलेली एक प्रतिज्ञा आहे. "माती आणि पाणी हे नैसर्गिक संसाधने एकमेकांवर अवलंबून असून भविष्यातील पिढीसाठी त्यांचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. "लातूरकरांनी नेहमीच एकत्र येण्याची वृत्ती दाखवली आहे. या वॉकेथॉनमध्येही नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत असून 'जलसंवर्धनासाठी तीन किलोमीटर' चालणार आहेत.

लातूरची भौगोलिक रचना पाहता, येथील भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी आपल्याला 'पाणलोट क्षेत्र विकास' आणि 'भूजल पुनर्भरण' यावर भर देणे अनिवार्य आहे. मोठ्या धरणांवर अवलंबून राहण्यापेक्षा स्थानिक पातळीवर पावसाचे पाणी जमिनीत जिरवणे अधिक शाश्वत आहे. जिल्ह्यातील पाणी टंचाईवर कायमस्वरूपी उपाय म्हणून आपण मृदसंधारण आणि जलसंधारणाचे महत्त्व ओळखले पाहिजे. जेव्हा आपण तीन किलोमीटर चालणार आहोत, तेव्हा आपण केवळ अंतर कापत नाही, तर आपण आपल्या जमिनीतील ओलावा आणि समृद्धीसाठी चालत आहोत.

आजची युवा पिढी तंत्रज्ञानात प्रगत आहे. या अभियानांतर्गत १५ ते ३० वयोगटातील तरुणांसाठी 'मृद व जलसंधारण रील्स स्पर्धा' पार पडली. #SaveSoilSaveWater या हॅशटॅगसह लातूरच्या जलसंधारण कामांचे व्हिडिओ सोशल मीडियावर



शेअर केलेले आहेत. हे केवळ मनोरंजन नाही, एक 'डिजिटल लोकचळवळ' आहे. लातूरचा युवक जेव्हा आपल्या गावातील शेततळे किंवा बंधाऱ्याचा व्हिडिओ जगाला दाखवेल, तेव्हा ती खऱ्या अर्थाने जलजागृती ठरेल. "एक Reel... मातीसाठी, एक Reel... पाण्यासाठी!, एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी !" हा मंत्र या सप्ताहात प्रत्येकाच्या मोबाईलवर निनादला आहे. महाराष्ट्र युवा जलदूत नावाने सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रकासहित प्रथम पुरस्कार २५ हजार, द्वितीय पुरस्कार १५ हजार आणि तृतीय पुरस्कार १० हजार मिळणार आहे.

जलसंधारण अभियानाचा एक भाग म्हणून १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी २०२७ पर्यंत विविध उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये 'एक शाळा-एक शोषखड्डा' आणि 'एक पेड माँ के नाम' यांसारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. शाळांमधील पाण्याचे योग्य पुनर्भरण करणे, जिल्ह्यातील जमिनीची धूप रोखणे आणि आर्द्रता टिकवणे. जलसाठ्यांची स्वच्छता आणि सुशोभीकरण आदींचा समावेश आहे.

या अभियानाचा आत्मा 'मृद व जलसंधारणाची शपथ' हा आहे. लातूरच्या प्रत्येक नागरिकाने, मग तो शेतकरी असो, डॉक्टर असो की विद्यार्थी, ही शपथ कृतीत उतरवणे आवश्यक आहे. आपण जेव्हा म्हणतो की, "मी पाण्याचा प्रत्येक थेंब जपेन," तेव्हा ती लातूरला अधिक समृद्धशाली होण्या साठीची ग्वाहीच असेल. लातूर जिल्हाधिकारी या समितीचे अध्यक्ष म्हणून या उपक्रमाचे नेतृत्व करत आहेत. पोलीस प्रशासन, एनसीसी, एनएसएस आणि सर्व स्वयंसेवी संस्थांनी या महा वॉकेथॉनमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून लातूरला 'जलयुक्त' करण्यासाठी पुढे आले आहेत.

महा वॉकेथॉन ही केवळ एक दिवसाची औपचारिकता नाही. आज आपण जे पाणी वापरत आहोत, ते आपण आपल्या पूर्वजांकडून वारसा म्हणून मिळालेले नाही, तर ते आपण आपल्या येणाऱ्या पिढीकडून 'कर्ज' म्हणून घेतलेले आहे. ते फेडण्यासाठी आपल्या लातूरची भूजल पातळी वाढवण्यासाठी आपण सर्वच कटीबद्ध आहोत. तर चला २१ ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजता, जिल्हा परिषदेच्या प्रांगणात उपस्थित राहण्यासाठी घराबाहेर पडूया, महा वॉकेथॉनमध्ये सहभागी होऊया... आणि लातूरला जलसमृद्ध करण्याचा संकल्प करूया!

पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त लातूर घडवा!

– डॉ. श्याम टरके,

## थोडक्यात पण महत्वाचे

### हवेली तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा!

**लोणी काळभोर : दैनिक संध्या**

जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी व त्यांना अंतराळ संशोधनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्यासाठी राबवण्यात आलेल्या विशेष निवड प्रक्रियेत, हवेली तालुक्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या प्रक्रियेतून हवेली तालुक्यातील एकूण १० विद्यार्थ्यांची जगातील अग्रगण्य अंतराळ संशोधन संस्थांच्या (नासा, इस्रो आणि युरोपियन स्पेस एजन्सी) अभ्यासदौऱ्यासाठी अंतिम निवड झाली आहे. नासा (अमेरिका) भेटीसाठी कार्तिक सुधाकर वाळके ( रा. लोणीकंद),पार्थ विक्रम ताजणे (रा. पेरणे) यांची तर इस्रो (भारत) ओम स्वप्नील यादव ,अनन्या सुनील देशमुख ,राधिका अतुल बोबडे ,सुहानी विलास चव्हाण , अथर्व रामदास कंद ( सर्व रा .लोणीकंद), विश्वेशा विशाल ओहाळ (गाऊडदरा) यांची निवड झाली भेटीसाठी युरोपियन स्पेस एजन्सी (ESA - युरोप) श्रावणी बाळू आंबेकर , सिद्धी सुभाष इंगळे (दोघेही रा. लोणीकंद) यांची निवड झाली . जिल्हा परिषदेच्या वतीने इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ही निवड प्रक्रिया तीन कठीण टप्प्यांत राबवली गेली यामध्ये पहिल्या चाचणीत संपूर्ण जिल्ह्यातून २३,६६२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.दुसऱ्या चाचणीत पहिल्या टप्प्यातून १,६६४ विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले.तर अंतिम चाचणी (आयुका): 'आयुका' ( आंतरविद्यापीठीय खगोलविज्ञान आणि खगोलभौतिकी केंद्र) मार्फत घेण्यात आलेल्या अंतिम चाचणीतून जिल्ह्यातील एकूण १०३ विद्यार्थ्यांची निवड झाली, ज्यामध्ये हवेलीतील १० विद्यार्थ्यांनी आपली जागा निश्चित केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना थेट जागतिक पातळीवरील अंतराळ संशोधन संस्थांना प्रत्यक्ष भेट देण्याची व तेथील संशोधन जवळून अनुभवण्याची ही दुर्मिळ संधी मिळाली आहे. या यशामुळे हवेली तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात, पालकवर्ग व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्वोतपरी सहकार्य करणार असून, पुढील वर्षीच्या परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची निवड होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी सांगितले.



### श्रावणामुळे चाकण बाजारात फळभाज्या व पालेभाज्या महागल्या

**चाकण : दैनिक संध्या**

श्रावणामुळे चाकण येथील उपबाजारात फळभाज्यांसह पालेभाज्यांची उच्चांकी आवक होऊनही भाज्या महागल्या आहेत. चाकण येथे दररोज फळभाज्यांसह पालेभाज्यांचा मोठा बाजार भरतो. श्रावण महिना सुरू असल्याने येथील पालेभाज्यांच्या बाजारात हिरवी मिरची, मेथी कोथिंबीर यांची प्रचंड आवक झाली. मेथीच्या जोडीचे भाव कडाडले आहेत. एका जुडीची किंमत वीस रुपये असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे रताळी यांची मोठी आवक झाली असून, भावात वाढ झाली आहे. पसतीस रुपये किलो रताळ्याचा भाव असल्याचे व्यापारी रविंद्र बोराटे व धनंजय बोराटे यांनी सांगितले.

### ग्रामसेवकांना डिजिटल हजेरीचा दणका; GPS व बायोमेट्रिकने गैरहजेरीला चाप

**पुरंदर : दैनिक संध्या**

ग्रामीण भागात ग्रामसेवक कार्यालयात वेळेवर येत नाहीत, नागरिकांचे दाखले रखडतात या तक्रारींची दखल घेत ग्रामविकास विभागाने आता राज्यातील सर्व ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांची हजेरी GPS आणि बायोमेट्रिक प्रणालीद्वारे बंधनकारक केली आहे. या निर्णयामुळे प्रशासनातील गैरहजेरीवर आळा बसणार आहे. ग्रामविकास विभागाकडून सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी आदेश गेले असून नाशिक जिल्हा परिषदेने तात्काळ अंमलबजावणीचे परिपत्रकही काढले आहे. या निर्णयामुळे ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये नियमित उपस्थिती वाढेल आणि नागरिकांची प्रलंबित कामे वेळेत मार्गी लागतील. GPS प्रणालीमुळे कर्मचारी निर्धारित कार्यस्थळी आहेत का याची पडताळणी होणार असून बायोमेट्रिकमुळे प्रत्यक्ष उपस्थितीची नोंद विश्वासार्ह होणार आहे.

**सरपंच संघटनेचे स्वागत**

"ग्रामपंचायत कार्यालयात कर्मचारी उपस्थित आणि नागरिकांची कामे तत्पर, या उद्देशाने डिजिटल उपस्थितीचा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. आता ग्रामसेवकांच्या उपस्थितीवर थेट डिजिटल नजर राहणार असल्याने प्रशासन अधिक गतिमान होईल."

- हरिदास खेसे, अध्यक्ष, सरपंच संघटना, पुरंदर तालुका

"महिला सरपंचांना ग्रामसेवक वेळेवर भेटत नसल्याने अनेक ठराव रखडायचे. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो."

- महिला अध्यक्षा, सरपंच संघटना, पुरंदर तालुका

**सर्वांनाच नियम लागू करा - जाणीव हॉकर्स संघटणा**

"हा कायदा फक्त ग्रामसेवकांनाच नाही, तर प्रत्येक शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना बंधनकारक होणे गरजेचे आहे. तलाठी, कृषी सहाय्यक, आरोग्य सेवक, शिक्षक, पोलीस पाटील, ग्रामपंचायत शिपाई ते मंत्रालयातील कर्मचारी यांना देखील GPS हजेरी लावली तरच सामान्य जनतेला खऱ्या अर्थाने पारदर्शक प्रशासन मिळेल. आम्ही या निर्णयाचे स्वागत करतो, पण सरकारने याची व्याप्ती वाढवावी."

- निलेश भुजबळ, अध्यक्ष, जाणीव हॉकर्स संघटना, पुरंदर तालुका

# हुतात्मा राजगुरूंच्या ११८व्या जयंतीनिमित्त अभिवादन


**■ राजगुरुनगर (दै. संध्या)**

थोर क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांची ११८वी जयंती राजगुरुनगर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांना अभिवादन करण्यात आले.

राजगुरुनगर एसटी बसस्थानकाजवळील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव स्मृतीस्मारक स्थळी हुतात्मा राजगुरू प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेंडसे,नायब तहसीलदार अनिल मोरे पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील,प्राचार्य पिंगळे,सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य रेखा जाधव,शिवसेना जिल्हा संघटक विजया ताई शिंदे,रेखा श्रोत्रीय,ॲड.मनिषा टाकळकर,आदर्श सरपंच कुंडलिक कोहिनकर, नारायण शिंदे,हुतात्मा राजगुरू प्रतिष्ठान चे पत्रकार कोंडिबा टाकळकर, ॲड.मुकुंद आवटे, हुतात्मा राजगुरू फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर,अशोक दुगड तसेच शाळा,कॉलेज तसेच एन.सी.सी. च्या विद्यार्थी,तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जयंती निमित्ताने राजगुरू यांचे वंशज सत्यशील राजगुरू,प्रशांत राजगुरू उपस्थितीत हुतात्मा राजगुरू यांच्या जन्मस्थळी असलेल्या राष्ट्रीय स्मारकात उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या दरम्यान तहसीलदार प्रशांत बेंडसे,नायब तहसीलदार रवींद्र मोरे,नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अंबादास गरकळ पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत ,भाजप तालुका अध्यक्ष शांताराम भोसले,विजयाताई शिंदे,ॲड. मनिषा टाकळकर,रेखा श्रोत्रीय,अमर टाटीया,कुंडलिक कोहिनकर,वैभव गुंडाळ, हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख,सुशील मांजरे,शैलेश रावळ,आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपविभागीय अधिकारी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की हुतात्मा राजगुरू यांनी देशासाठी केलेले कार्य,त्यांचे त्याग, शौर्य आणि देशभक्तीची प्रेरणा नव्या पिढीने घेऊन आप आपल्या क्षेत्रात योगदान द्यावे,

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने देशप्रेमी नागरिक तसेच विविध ठिकाणांहून आलेले राजगुरूभक्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र गायकवाड यांनी केले.



### हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचे नाव

पुणे- नाशिक महामार्गावरील भुयारी मार्गाला हुतात्मा शिवराम हरी राजगुरू भुयारी मार्ग असे नाव देण्यात आले असून,त्यांचे लोकार्पण वंशज सत्यशील राजगुरू यांच्या हस्ते करण्यात आले.

## टी.बी. रुग्णांना जनसेवा संकल्प फाउंडेशनकडून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप




**■ पुरंदर : (दै. संध्या)**

सामाजिक बांधिलकी जपत जनसेवा संकल्प फाउंडेशनच्या वतीने आणि फाउंडेशनचे सदस्य राहुल खेडेकर यांच्या पुढाकारातून ग्रामीण रुग्णालय, सासवड येथे परिसरातील टी.बी. रुग्णांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या खाण्याच्या वस्तूंचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमाच्या माध्यमातून टी.बी. रुग्णांना उपचारांसोबतच त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी मदतीचा हात देण्यात आला. सामाजिक संस्थांनी समाजातील गरजू घटकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालय सासवडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन अकमार, जनसेवा संकल्प फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सरोज मॅडम, डॉ. पाटील, डॉ. सूर्यवंशी, अकबर, फिरोज, इभाड, श्री. विजय सोनवणे, विजयकुमार शिंदे,घोडेकर, भोसले, तांबोळी, शेख, सुवर्णा जाधव,कदम, राऊत, पराग जाधव, संदीप एरंडकर,दीपक गोंधळी, गुंजे,दिनेश इनामके तसेच ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन अकमार यांनी, सामाजिक संस्थांनी पुढे येऊन सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेत गरजू रुग्णांसाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवावेत, असे आवाहन स्थानिक संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांना केले.

## सर्वतोपरी मदत करण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू : आमदार बाबाजी काळे

**■ राजगुरुनगर (दै. संध्या)**

प्रतिष्ठानच्या माध्यमातून तळागाळातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविण्याचे कार्य कैलास दुधाळे सातत्याने करत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याचे कौतुक करून, गरीब व गरजू घटकांसाठीच्या सामाजिक उपक्रमांना सहकार्य करून मदत करू, असे आश्वासन आमदार बाबाजी काळे यांनी दिले.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या ११८ व्या जयंतीचे औचित्य साधून , माऊली प्रतिष्ठान चे संस्थापक कैलास दुधाळे लिखित "माणुसकी जिवंत आहे" पुस्तकाचे प्रकाशन व कृतज्ञता पुरस्कार सोहळा येथील चंद्रमा मंगल गार्डन कार्यालयात पार पडला. कार्यक्रमास सामाजिक, राजकीय,साहित्यिक, शैक्षणिक,चित्रकार तसेच पत्रकार व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.नामवंत कीर्तनकार व जगतगुरु फाउंडेशनचे डॉ.चेतानानंद महाराज,पुणेकर, व सातारा येथील यशोधन अनाथ आश्रम चे रवी बोडके,यांच्या शुभहस्ते झालेल्या या पुस्तक प्रकाशन सोहळा दरम्यान व्यासपीठावर आमदार बाबाजी काळे,नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ,अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस,गिरीश प्रभुणे, पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत,चैतन्य संस्थेचे सुधाताई कोठारी,माजी जि.परिषद सदस्य शरद बुट्टे,कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अशोक राक्षे,शिवसेना जिल्हा उपप्रमुख रामदास आबा धनवटे ,जिल्हा परिषद सदस्य विजय शिंदे, आणि माऊली प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष कैलास दुधाळे उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार म्हणाले माऊली सेवा प्रतिष्ठान तालुक्यातील अनेक गोर गरीब गरजू घटकासाठी सातत्याने मदत करत आहे. पक्षाच्या पाठीमागे न उभे न राहता, चांगल्या माणसाच्या पाठीमागे उभे राहण्याची भूमिका प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे यांनी घेतली.पैशाची श्रीमंती न पाहता माणुसकीची श्रीमंती या माध्यमातून जपली असल्याने तालुक्यातील विविध क्षेत्राशी संबंधित नागरिकांशी नाळ जुडली आहे.

कार्यक्रमांतर्गत विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करणारे दिलीप गुंजाळ,प्रीती वैद्य,अनिल कुडिया,डॉ. अभिजीत सोनवणे,गौरी धुमाळ,अक्षय बोऱ्हाडे,माऊली सावंत,दादाराव गायकवाड,कांचन कदम,डॉ.नंदकुमार पालवे, एम.ए.हुसेन समाजसेवकांना कृतज्ञता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी यशोधन अनाथ आश्रम चे रवी बोडके,डॉ.चेतानानंद महाराज

माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे,डॉ.श्रीपाल सबनीस,गिरीश प्रभुणे,यांनी मनोगत व्यक्त केले.

### गरीब कुटुंबांना मोफत कपडे,

माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून कैलास दुधाळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. गरीब कुटुंबांना मोफत कपडे, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, तसेच निराधार व दिव्यांग व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून त्यांनी माणुसकीची जपणूक केली आहे. याशिवाय वैफल्यग्रस्त व बेवारस व्यक्तींवर उपचार करून त्यांच्यासाठी निवारा उपलब्ध करून देण्याचेही कार्य त्यांनी केले आहे.

रिक्षाचालक तसेच निवेदक म्हणून कार्यरत असलेल्या कैलास दुधाळे यांनी आपले बंधू स्वर्गीय तानाजी दुधाळे यांच्या प्रेरणेतून सामाजिक कार्याला वाहून घेतले. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता गरजूंच्या मदतीसाठी ते सातत्याने पुढाकार घेत आहेत.

तालुक्यातील त्यांच्या या सामाजिक कार्याची प्रेरणादायी कहाणी ‘माणुसकी जिवंत आहे’ या पुस्तकातून उलगडण्यात आली आहे. कैलास दुधाळे यांच्या कार्यातून समाजातील दुर्बल घटकांसाठी मदतीचा हात पुढे करण्याची आणि माणुसकी जपण्याची प्रेरणा मिळत आहे.




## जेजुरी नगरपरिषद आयोजित मंगळागौर ला महिलांचा मोठा प्रतिसाद




**■ जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचा सण असलेल्या मंगळागौरीचे औचित्य साधून जेजुरी नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने ‘सामाजिक प्रबोधनाची मंगळागौर’ मल्हार नाट्यगृहात उत्साहात साजरी करण्यात आली. या उपक्रमाला मोठ्या संख्येनेमहिलांनी उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

या सांस्कृतिक सोहळ्यात जेजुरी पंचक्रोशीतील सुमारे दहा महिला संघटना व विविध महिला गटांनी सहभाग घेतला.

पारंपरिक मंगळागौरीच्या खेळांना सामाजिक प्रबोधनाची जोड देत जलसंवर्धन, ‘मुलगी वाचवा’, वृक्षसंवर्धन, पर्यावरण संवर्धन आणि देशप्रेम अशा विविध विषयांवर कार्यक्रम सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मल्हार नाट्यगृहाच्या प्रांगणात महिलांनी फेर धरत पारंपरिक मंगळागौरीची गाणी सादर केली.

■ कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या मीनल बारभाई, पंचगंगा निकुडे आणि माजी नगराध्यक्ष साधनाताई दिडभाई यांच्या हस्ते शंभू महादेवाच्या पिंडीवर बेल व भंडारा अर्पण करून करण्यात आले. यावेळी जेजुरी नगरपरिषदेच्या महिला नगरसेविका उपस्थित होत्या.

■ मंगळागौरच्या माध्यमातून महिलांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळाले. आपल्या कला, विचार, आचार आणि संस्कृतीचे दर्शन घडवतानाच सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्याचा प्रयत्न महिला संघटनांनी केला. आधुनिक काळात पारंपरिक सणांचे स्वरूप काही प्रमाणात बदलत असले, तरी संस्कृतीची नाळ जपत त्याला सामाजिक संदेशाची जोड देणारा हा उपक्रम लक्षवेधी ठरला.

■ समारोपप्रसंगी जेजुरी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी स्त्रीशक्तीचा गौरव केला. ‘जेजुरीतील महिला या समाजाचा खऱ्या अर्थाने मोठा कणा असून समाजाला सुसंस्कृत आणि योग्य दिशेने नेण्याचे सामर्थ्य महिला शक्तीत आहे,’ असे त्यांनी सांगितले.यावेळी आजी माजी नगरसेवक उपस्थित होते.



## काळभैरवनाथ मंदिराच्या प्रांगणात नागपंचमी विशेष महिला महोत्सव उत्साहात संपन्न

**■ इंदापूर (दै. संध्या)**

कालठण नं. १ येथील ऐतिहासिक श्री काळभैरवनाथ मंदिराच्या प्रांगणात शनिवार रोजी सायंकाळी ५ वा. नागपंचमीनिमित्त आयोजित करण्यात आलेला विशेष महिला महोत्सव अत्यंत आनंदी आणि उत्साही वातावरणात मोठ्या दिमाखात पार पडला. हा संपूर्ण कार्यक्रम ज्येष्ठ योग मार्गदर्शक तथा सामाजिक कार्यकर्ते काकासाहेब मांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. महिला पतंजली योग परिवार (जि. प. शाळा) कालठण नं. १, समस्त महिला मंडळ, सर्व महिला स्वयंसाहाय्यता बचत गट आणि ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवास इंदापूर तालुका महिला पतंजली परिवारातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तसेच कालठण गावातील स्थानिक महिला भगिनींनी एकत्र येत पारंपरिक संस्कृतीचा अनोखा संगम घडवून आणला. महोत्सवात महिलांनी पारंपरिक भलई गाणी, माहेरची गाणी म्हणत सुंदर फेर धरले. यानंतर झिम्मा, पिंगा, कावट, फुगड्यांचे विविध प्रकार आणि पारंपरिक नृत्यांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत महिलांनी नागपंचमीचा मनमुराद आनंद लुटला. यासोबतच रंगलेल्या उखाण्यांच्या चढाओढीने उपस्थित महिलांमध्ये हास्याची लकेर उमटवून कार्यक्रमात विशेष रंगत भरली.